गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक)
Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरीभाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अ‍ॅण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. १६.०८.२०२५ | अंक नं. ११७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डद्वारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
+ सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून जाहीर केलेली भाजपाची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करा

## अहिल्यानगरमधून स्टँप पेपरवर पाठविले प्रदेशाध्यक्षांना निवेदन, उच्च न्यायालयात दाद मागण्याचाही इशारा

नगर - भारतीय जनता पार्टीची अहिल्यानगर दक्षिण जिल्हा कार्यकारिणी करताना ज्यांनी पक्षासाठी अनेक वर्ष निष्ठेने काम केले, त्यांना डावलून केवळ राजकीय स्वार्थासाठी पक्षात नव्याने आलेल्या लोकप्रतिनिधी, नेत्यांच्या बगलबच्चांना संधी देण्यात आली आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून तयार करण्यात आलेली ही कार्यकारणी जिल्हाध्यक्षांसह बरखास्त करण्यात यावी, अशी मागणी भाजपाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे केली आहे.

याबाबतचे निवेदन त्यांनी थेट स्टँप पेपरवर प्रदेशाध्यक्षांना पाठविले आहे. यात म्हटले आहे की, अहिल्यानगर दक्षिण विभागातील भारतीय जनता पार्टीची स्थापना झाल्यापासून आत्तापर्यंतची ७ पानी अहवालाची प्रत प्रत्यक्ष भेटून सादर करत आहोत. यामध्ये भारतीय जनता पार्टीची जुने जाणते, पक्षनिष्ठ व पक्षाची विचारधारा जोपासणाऱ्या कार्यकर्त्यांचा अहवाल लिखित स्वरुपात तयार केला असून, मागील दशकापासून भाजपाच्या पदरात आलेले विविध राजकीय पक्षातून पतन झालेले व राजकीय मृत्यू झाल्यानंतर भाजपच्या आश्रयाला आलेले अतीक्रमनीत आलेले लोक हे पक्षाच्या कुठल्याही विचारधारेशी निष्ठावान नसून त्यांची या कार्यकारणीत वर्णी लागली आहे.

तर दुसरी बाजू अशी कि, भाजपासाठी ज्या कार्यकर्त्यांनी ३० ते ४० वर्षापासून आपले आयुष्य व तारुण्य प्रणाला लावले, अशा पक्षाच्या सच्चा व निष्ठावान कार्यकर्त्याला केवळ राजकीय व सामाजिक द्वेषापोटी त्यांना या पक्ष कार्यकारणीतून अलगद बाजूला ठेवले आहे. ही गठीत झालेली कार्यकारणी सच्चा व निष्ठावान आणि पक्षाच्या लढावू कार्यकर्त्यांची नसून केवळ जातीवादी, विषारी मानसिकतेतून अत्यंत गलिच्छ राजकारण करणाऱ्या लोकप्रतिनिधीच्या लाचार कार्यकर्त्यांची ही फळी आहे. त्यामुळे सदरील जिल्हा कार्यकारणी ही 'फर्जी' असून पक्षाची प्रतिष्ठा व सन्मान जपण्यासाठी या कार्यकारणीवर प्रदेश भाजपचे संघटनात्मक प्रमुख म्हणून आपण स्वतः लक्ष घालून या कार्यकरणीचे शुद्धीकरण *(पुढील मजकूर पान २ वर)*



### चिखलामुळे स्टेट बँक चौकात घसरगुंडी

शहरातील कोठला ते स्टेट बँक चौक दरम्यान महामार्गाच्या कडेने पाईपलाईन टाकण्यासाठी केलेल्या खोदाई मुळे महामार्गावर चिखलाचे साम्राज्य पसरले असून त्यामुळे अनेक दुचाकी वाहने घसरून पडत आहेत. गेल्या २ दिवसांपासून शहरात होत असलेल्या पावसाने ही दलदल झाली असून त्यामुळे २ दिवसांत अनेक दुचाकी स्वार घसरून पडत जखमी झाले आहेत. या ठिकाणी एखादी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असून महापालिकेने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. (छाया - बबलू शेख)

बाळांच्या वजन, उंची, भूक व प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी आजच भेट द्या.
सन-२०१० पासून
चिरायु
लहान मुलांचे क्लिनिक
(जन्मापासून ते १८ वर्षापर्यंत)
प्रसिध्द बालरोग तज्ञांचा सल्ला
शाखा १ - सबजेल चौक, तुळजाभवानी मंदिरासमोर (डायमंड बेकरी समोर) अहिल्यानगर
9527931384
8830400170

क्षारयुक्त पाण्यामुळे पाइपलाईन वारंवार जाम होते?
पाईप खराब होतात?
मग आजच घरी आणा इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर व क्षारयुक्त पाण्याचा प्रश्न कायमचा सोडवा...
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009
9822542011

मंगल कार्यालय किंवा मंगल कार्यालयाच्या हिशोबाने शेड किंवा हॉल भाड्याने पाहिजे
संपर्क- 9822254190

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज




पुरुषांसाठी ब्रॅण्डेड शर्ट
(3XL, 4XL पर्यंत) Rs.550/- ला 1, Rs.1500/- ला 3
(2XL, 3XL, 4XL पर्यंत) Rs.400/- ला 1, Rs.1100/- ला 3
जिन्स व फॉर्मल पॅन्ट साईज ३४ पर्यंत Rs.1200/- ला 3 व साईज 36 पासून पुढे Rs.1500/- ला 3, मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
1 किलो । 500 ग्रॅम । 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय स्मारकाच्या जलद विकासासाठी सरकारने चोंडीच्या सिना नदीवर २ बुडीत बंधारे बांधण्यास दिली मंजुरी

### ५० कोटी खर्चाच्या प्रकल्प सर्वेक्षणासाठी २१ लाख रुपये मंजूर : सभापती प्रा. राम शिंदे

जामखेड - श्री क्षेत्र चोंडी येथे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'च्या धर्तीवर साकारल्या जाणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय स्मारकाच्या जलद विकासासाठी सरकारने चोंडीच्या सिना नदीवर २ बुडीत बंधारे बांधण्यास मंजुरी दिली आहे. यासाठी ५० कोटींचा खर्च अपेक्षित असून या प्रकल्पाच्या सर्वेक्षणासाठी सरकारने २१ लाख रूपये मंजुर केले आहेत. या बंधाऱ्यांमुळे सिंचन, पाणीपुरवठा, नदीपात्राचे सौंदर्यवर्धन आणि पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्म त्रिशताब्दी वर्षानिमित्त श्री क्षेत्र चोंडी (ता. जामखेड) येथे ६ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची विशेष बैठक पार पडली होती. या बैठकीत विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकारातून तयार करण्यात आलेल्या 'श्री क्षेत्र चोंडी बृहत विकास आराखड्यास' सरकारने मंजुरी दिली होती. या आराखड्यासाठी ६८१ कोटी ३२ लाख रूपये खर्चाच्या मान्यता देत शासन निर्णय जारी करण्यात आला होता.

त्यानंतर पावसाळी अधिवेशनात चोंडीला जोडणाऱ्या रस्त्यांच्या कामांसाठी सरकारने ३६० कोटींचा निधी मंजुर केला होता आता चोंडी येथील सिना नदीवर २ बुडीत बांधण्यास सरकारने मंजुरी दिली आहे. जलसंपदा विभागाने सिना नदीवरील दोन बुडीत बंधारे बांधणीसाठी ५० कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे सविस्तर सर्वेक्षण करण्यास प्रशासकीय मान्यता दिली आहे. या सर्वेक्षणासाठी रु. २१.१३ लाख खर्च मंजूर करण्यात आला आहे, हे काम महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत केले जाणार आहे. या कामामुळे नदीपात्राचे सौंदर्यवर्धन होणार आहे. तसेच नदीत पाणीसाठा वाढून परिसराला दीर्घकालीन सिंचन व पाणीपुरवठ्याचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

श्री क्षेत्र चौंडी बृहद विकास आराखड्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मस्थळाचे सुशोभीकरण, नदीत भव्य पुतळा, चौंडी येथे देशभरातून येणाऱ्या पर्यटकांसाठी सुव्यवस्थित रस्ते, संग्रहालय, महादेव मंदिर आणि चौंडीश्वरी मंदिर जीर्णोध्दार, निवास व्यवस्था, सुसज्ज वाहनतळ, स्थानिक उत्पादने व खाद्यपदार्थ यांची बाजारपेठ, चौंडी परिसरातील ऐतिहासिक, पौराणिक स्मृतीस्थळांचे जतन, पायाभूत सुविधा उभारणी, सिना नदी सुशोभीकरण व शुद्धीकरण, तसेच दोन बुडीत बंधारे बांधणीचा समावेश आहे.

विकास आराखड्याचा एकुण निधी तपशील - चौंडी येथील स्मृतीस्थळांचे जतन व संवर्धन - रु. ६८१ कोटी ३२ लाख, चौंडीला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे - रु. ३६० कोटी, सिना नदीवरील दोन बुडीत बंधारे - रु. ५० कोटी. एकूण रु. १०९१ कोटी ३२ लाख (आज अखेर मंजुर निधी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहचावे, जगाला प्रेरणा मिळावी, यासाठी चोंडीत राष्ट्रीय स्मारक उभारत आहोत. या प्रकल्पासाठी महायुती सरकारने १०९१ कोटी ३२ लाख रूपयांचा निधी उपलब्ध केला आहे. सिना नदीवरील दोन बुडीत बंधारे या प्रकल्पाच्या विकासासाठी महत्वाचे पाऊल आहे. चोंडी विकास प्रकल्पासाठी भरघोस निधी मंजुर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, व महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार मानत असल्याचे प्रा. राम शिंदे म्हणाले.

## पुष्पाबाई गुंदेचा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - शहरातील पुनममोतीनगर येथील रहिवासी पुष्पाबाई चंदनमल गुंदेचा (वय ८२) यांचे १५ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, नातवंडं, पतवंड असा परिवार आहे. चंदन प्लास्टिकचे रमेश, विलास, मनोज गुंदेचा आणि आशा कटारीया यांच्या त्या मातोश्री व सुभाष, प्रकाश आणि सतीश गुंदेचा यांच्या काकीजी होत. त्यांचे इच्छेनुसार मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले.


## राजेश हेडा यांचे दुख:द निधन



नगर - तपकीर गल्ली येथील रहिवासी राजेश रामप्रसाद हेडा (वय ५५) यांचे १६ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, ५ बहिणी असा परिवार आहे. ते सचिन हेडा यांचे बंधू तर अथर्व हेडा यांचे वडील होत.

## बन्सीलाल पोखरणा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बुरूडगाव रोड येथील साईनगर परिसरातील रहिवासी बन्सीलाल मोहनलाल पोखरणा (वय ९४) यांचे १६ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते राधेशाम ट्रेडर्सचे संचालक होते.

## श्रीमती मिराबाई व्यवहारे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - भुतकरवाडी येथील रहिवासी श्रीमती मिराबाई भगवान व्यवहारे (वय ६५) यांचे १५ ऑगस्ट रोजी हृदयविकराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ४ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नायब तहसीलदार स्व. भगवान व्यवहारे यांच्या त्या पत्नी होत तर ॲड. आनंद व्यवहारे व न्यायाधिश सौ. रेणुका सातव यांच्या मातोश्री होत.

## महापालिका निवडणुकीची तयारी करणाऱ्या युवकावर जीवघेणा हल्ला

### माजी नगरसेवक नज्जू पैलवान, रशीद दंडा यांच्यासह ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - महापालिका निवडणूक लढविण्याची तयारी करणाऱ्या युवकावर लाकडी दांडके, कोयत्याने हल्ला करून त्यास जीवे मारण्याचा प्रयाथ केल्याची घटना १४ ऑगस्ट रोजी रात्री १० च्या सुमारास शहरातील जीपीओ चौक परिसरात इब्राहीम कॉलनी येथे घडली. या प्रकरणी माजी नगरसेवक नजीर अब्दुलरज्जाक जहागीरदार उर्फ नज्जू पैलवान, रशीद अब्दुल जहागीरदार उर्फ रशीद दंडा यांच्यासह ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अबुताला अकिल शेख (वय २४, रा. इब्राहीम कॉलनी, जीपीओ चौक परिसर) याने कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी याचा स्क्रॅपचा व्यवसाय आहे. तो १४ ऑगस्ट रोजी दुपारी २.३० च्या सुमारास त्याच्या काकांच्या घरी झेंडीगेट येथे मोपेड वर जात असताना त्याला नज्जू पैलवान, रशीद दंडा, इम्रान बशीर जहागीरदार, इम्तियाज जहागीरदार यांनी अडविले. त्यावेळी नज्जू पैलवान म्हणाला तू हमारे खिलाफ खडा हो रहा है, त्यावर फिर्यादी म्हणाला की लोकशाही है, कोई भी किसीके खिलाप खडा हो सकता है. असे म्हणाल्यावर इम्रान बशीर जहागीरदार व रशीद दंडा यांनी आज तेरी व्हिकेट डालेंगे असे म्हणत त्यांच्या अंगावर धावून गेले. त्यामुळे घाबरून अबुताला शेख हा त्याच्या काकांच्या घरात पळाला. त्यानंतर ते चौघे तेथून निघून गेले.

त्यानंतर रात्री १० च्या सुमारास फिर्यादी हा घराजवळ चौकात बसलेला असताना नज्जू पैलवान, रशीद दंडा, इम्रान बशीर जहागीरदार, इम्तियाज जहागीरदार, अकिब जहागीरदार, अश्रफ जहागीरदार, फैजान जहागीरदार, जीशान इम्तियाज जहागीरदार, मोईन आलम जहागीरदार हे तेथे आले. त्यावेळी इम्रान जहागीरदार याच्या हातात बंदूक होती तर इतरांच्या हातात लाकडी दांडके, कोयते होते. त्यावेळी नज्जू पैलवान याने फिर्यादी कडे हात करून आज इसको छोडेंगे नही, इसको मारो असे म्हणाला. त्यावेळी या सर्वांना पाहून चौकातील इतर लोक घाबरून पळाले. अकिब व अश्रफ यांनी त्यांच्या हातातील कोयते फिर्यादीच्या दिशेने फिरविले तर रशीद दंडा व इतरांनी फिर्यादीला लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण केली. त्यामुळे तो चक्कर येवून खाली पडला. त्यावेळी नज्जू पैलवान याने हमारे खिलाफ खडा हुवा तो जान से मार देंगे असे म्हणत ते सर्वजण तेथून निघून गेले. त्यानंतर फिर्यादीला त्याच्या काकांनी मोटारसायकल वर बसवून उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचार घेत असताना १५ ऑगस्ट रोजी फिर्यादीने पोलिसांना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी ९ जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



बुरूडगाव रोडवरील स्कायब्रिज येथील रहिवाशांनी भारताचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करून हर घर तिरंगा अभियानात सहभाग नोंदविला.

## निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलून जाहीर केलेली भाजपाची जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करा

*(पान १ वरुन)*

करण्यात यावे व पक्षाच्या सच्चा व निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय देण्यात यावा.

भाजप हा घटनेवर आधारित असून त्यानुसार निर्णय राबविले जातात. ज्या कार्यकर्त्यांनी भाजपची ध्येय, धोरणे, विचारधारा, व तत्वप्रणाली जोपासण्यासाठी वेळ, श्रम, बुद्धी, पैसा, व कौशल्य हे पंचदान अर्पण करून स्वत:चे आयुष्य व भविष्य पार्टीला समर्पित केले आहे. त्यांच्यावर अन्याय झाल्यास, वरील विषयाला छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात जलदगतीने आव्हान दिले जाईल, असा इशारा प्रा. सुनील मोहनराव पाखरे, नागनाथ भारतराव गर्जे, युसुफ उस्मानगणी शेख यांनी दिला आहे. या निवेदनाची प्रत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष यांनाही पाठविण्यात आली आहे.

## सरस्वतीबाई अडसूळ यांचे हृदयविकाराने निधन



नगर - नगर तालुक्यातील हिंगणगाव येथील रहिवाशी सरस्वती अर्जुन अडसूळ (वय ५८) यांचे १४ ऑगस्ट रोजी हृदयविकाराने निधन झाले.

त्यांच्या पाश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, भाचे, जावा, नातू असा परिवार आहे. अर्जुन अडसूळ यांच्या त्या पत्नी होत.

## सुनील मानकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दिल्लीगेट येथील रहिवासी सुनील (बाळासाहेब) किसनराव मानकर (रद्दीवाले) (वय ५३) यांचे १६ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पुतणे, भाचे, १ बहीण असा परिवार आहे.

## वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करून नवीन कनेक्शन द्या अन्यथा महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करणार

नगर - बोल्हेगाव गांधीनगर येथील उभा मारुती परिसरात गेली १५ ते १६ वर्षे वास्तव्य करणाऱ्या नागरिकांपैकी केवळ २० ते २५ कुटुंबांना वीज कनेक्शन उपलब्ध आहे. उर्वरित कुटुंबांनी गेल्या पाच-सहा वर्षांपासून वेळोवेळी प्रयत्न करूनही अद्याप वीज कनेक्शन मिळालेले नाही. दरम्यान, कनेक्शन असलेल्या एका व्यक्तीकडून बेकायदेशीरपणे आकडा टाकून वीज पुरवठा केला जात असून त्यासाठी ५०० ते ६०० रुपये मासिक आकारले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रकार स्थानिक पावर हाऊसच्या वायरमेनच्या संगनमताने सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे.



वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करून नवीन कनेक्शन द्या या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने विद्युत महावितरण कार्यालयासमोर निदर्शन करून नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

नागरिकांनी स्पष्ट केले की, ते स्वतः च्या हक्काचे मीटर व कायदेशीर वीज पुरवठा मागत असून, वीज चोरी करणाऱ्यांवर त्वरित कारवाई व्हावी. तसेच, लवकरात लवकर आवश्यक पूर्तता करून नवीन कनेक्शन द्यावे. या मागण्यांसाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने विद्युत महावितरण कार्यालयासमोर निदर्शन करून निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, महिला आघाडी शहराध्यक्ष सुनीता शिंदे, महेश भोसले, अतुल भिंगारदिवे, कविता कवडे, बेबीताई टकले, सविता काळे, अलका मैड, संगीता जाधव, संजीवनी राजपूत, मोईन शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात इशारा देण्यात आला आहे की, वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई करून नवीन कनेक्शन न दिल्यास आठ ते दहा दिवसांत सुनील शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडले जाईल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## लिलाबाई पल्लोड यांचे वृद्धापकाळाने निधन



नेवासा - देशपांडे गल्ली येथील मुथ्था मेडीकल शेजारील रहिवासी श्रीमती लिलाबाई राधेश्याम पल्लोड (वय ८४) यांचे १६ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नेवासा वैकुंठधाम अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, १ भाऊ, भावजय, १ मुलगी, जावाई, नातवंडे, नातजावाई असा परिवार आहे. त्या स्व. राधेशाम यांच्या पत्नी तर स्व. सुभाष व जगदीश पल्लोड यांच्या मातोश्री तर प्रसाद सुभाष पल्लोड यांच्या आजी होत.

## सोलर बसवून देण्याच्या नावाखाली १ लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

नगर - घरावर सोलर सिस्टीम बसवून देतो असे सांगून १ लाख रुपये घेवून सेवा निवृत्ताची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात दोघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहित गोपाळराव संगमकर (वय ५८, रा. काविजंग लॉन मागे, बी आर टी समोर, गुलमोहर रोड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांना घरावर सोलर सिस्टीम बसवायची होती, त्यामुळे त्यांनी काही ठिकाणी चौकशी केल्यावर त्यांची योगेश दिवेकर आणि अनिल सगळगिळे या दोघांशी भेट झाली. त्यांनी फिर्यादी यांना आम्ही सोलर सिस्टीमचे काम करतो असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांना ७ मार्च ते २१ मे दरम्यान फोन पे व चेक द्वारे १ लाख रुपये दिले. त्यानंतर त्यांनी फिर्यादी यांच्या घरावे सोलर सिस्टीम न बसवता उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यांच्याशी वारंवार संपर्क करूनही सोलर सिस्टीम बसविली नाही तसेच पैसे ही परत दिले नाहीत त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादी वरून पोलिसांनी योगेश दिवेकर आणि अनिल सगळगिळे यांच्या विरुद्ध बी एन एस कलम ३१८ (४), ३१६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## राम फाजगे यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - येथील दिपक ब्रास बॅन्ड चे मालक राम दिगंबर फाजगे (वय ६५) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पेंटर रविंद्र फाजगे व बेकरी व्यावसायिक लखन फाजगे यांचे वडील होत.

## अनिल गंगवाल यांचे दीर्घ आजाराने निधन



छत्रपती संभाजीनगर - उल्कानगरी येथील रहिवासी तथा एलआयसीचे माजी अधिकारी अनिल रतनलाल गंगवाल (वय ६६) यांचे दिर्घ आजाराने १५ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांचे मरणोत्तर देहदान करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, ४ भाऊ, ३ बहिणी असा परिवार आहे. एलआयसीच्या माजी महिला अधिकारी प्रिती गंगवाल यांचे पती व आर्किटेक्ट गगन गंगवाल यांचे ते वडील होत.

## केडगावमध्ये एकाची गळफास घेत आत्महत्या

नगर - केडगाव उपनगरातील ५ गोडावून परिसरात एकाने राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केल्याची घटना १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.युनुस मोहंमद शेख (वय ४७, मूळ रा. सोनेवाडी, ता. नगर, हल्ली रा. ५ गोडावून जवळ केडगाव) असे मयताचे नाव आहे. युनुस शेख यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्याचे नातेवाईक हिरालाल शेख यांनी त्यास तातडीने उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. शिंदे यांनी त्यास तपासून उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून कोतवाली पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.



अपात्र टेंडर पात्र झाल्याची चौकशी करून दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण करताना रोहित आव्हाड.

## अपात्र टेंडर पात्र कसे केले? चौकशी करून दोषींवर कारवाईच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण सुरू

नगर - जिल्हा परिषदेच्या आवारातील व नव्या इमारतीतील साफसफाईच्या कामासाठी मागवलेल्या निविदांमध्ये गंभीर गैरप्रकार झाल्याचा आरोप करत, अपात्र टेंडर पात्र करण्यात आले कसे, या प्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींवर शासन सेवेतून निलंबन अथवा बडतर्फीची कारवाई करण्याची मागणी करत विश्वास इंटरप्राईजेसचे प्रमुख रोहित आव्हाड यांनी जिल्हा परिषद कार्यालयात आमरण उपोषण सुरू केले.

यावेळी हरीश आल्हाट, अतुल शिंदे, नितीन कदम, सागर साळवे, सागर विधाते, सतीश कांबळे, राहुल आल्हाट, जय कदम उपस्थित होते.

दोषी कार्यकारी अभियंता, कनिष्ठ सहाय्यक, शाखा अभियंता व चौकशी समितीचे अध्यक्ष सदस्य या सदस्यांवर तात्काळ कठोर शिस्तभंगाची कारवाई होईपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही.

## माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्काराकरिता १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत

नगर - माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा पत्नींच्या पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांसाठी १५ सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

शासन नियमांनुसार, सन २०२४-२५ या वर्षात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धेत यश मिळवणाऱ्या खेळाडूंना सन्मानित केले जाईल. तसेच, इयत्ता १० वीच्या परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आणि १२ वीच्या परीक्षेत ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवून प्रत्येक बोर्डातील पहिल्या दहामध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सन्मानार्थ २० हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात येईल. यासोबतच, आयआयटी, आयआयएम, एम्स, आयसीएआर आणि आयबीएम यांसारख्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांना एक लाख रुपयांचा पुरस्कार दिला जाईल.

याशिवाय, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असताना विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या माजी सैनिक पत्नी आणि पाल्यांना २५ हजार रुपयांचा पुरस्कार आणि प्रशस्तिपत्र दिले जाईल.

देश आणि राज्याची प्रतिष्ठा वाढवणारे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी आणि पाल्यांना राष्ट्रीय स्तरावर २५ हजार रुपये, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ५० हजार रुपयांचा पुरस्कार, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात येईल.

या सर्व योजनांचा लाभ माजी सैनिक आणि त्यांच्या विधवा पत्नींच्या पाल्यांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

✼ दहा ग्रॅम गुळ व अर्धा चमचा खायचा चुना एकत्र करून त्याची एक गोळी तयार करावी. ही गोळी एक ग्लास कोमट पाण्यासोबत घेऊन थोडी झोप घ्यावी. थोड्याच वेळेत पोटदुखीवर आराम पडेल. जर पोट फारच जोराने दुखत असेल तर आल्याच्या रसामध्ये मध मिसळून त्याचे सेवन करावे. असे केल्याने पोट दुखणे थांबते.

✼ रात्री केळी खाणे टाळा आणि जर तुम्हाला गॅसची समस्या असेल तर ते अजिबात खाऊ नका. बद्धकोष्ठतेच्या वेळी फक्त पिकलेले केळे खा. लक्षात ठेवा कच्चे केळे बद्धकोष्ठता वाढवू शकते कारण त्यात जास्त स्टार्च असते. तुम्ही ते शेक बनवून किंवा फळांमध्ये मिसळून सहजपणे खाऊ शकता. जास्त प्रमाणात केळी खाऊ नका. दिवसातून १ किंवा २ पिकलेली केळी तुमच्या आरोग्यासाठी चांगली असतात. केळी खाताना, हिरव्या भाज्या, संपूर्ण धान्य, सॅलड इत्यादी फायबरयुक्त पदार्थांचाही समावेश करा.

## पाककला

### चॉकलेट मोदक

**साहित्य** – खवा १ वाटी, पिठी साखर २–४ चमचा, पिठीसाखर पाव वाटी, कोको पावडर २ चमचा, चॉकलेट इसेन्स २–३ थेंब.

**कृती** – खवा पुरणयंत्रातून काढून घ्या. त्यानंतर पिठीसाखरेसोबत व्यवस्थित परतून घ्या. मिश्रण घट्ट होऊ लागले, की पातेल्यात तो गोळा फिरू लागतो. त्यानंतर पातेले गॅसवरून खाली उतरा. घोटून पाच मिनिटांनी कोको पावडर व पिठीसाखर घाला. मिश्रण घट्ट झाल्यावर साच्यात टाका. चविष्ट मोदक तयार आहेत.

## सौंदर्य

बॉडी लोशनमध्ये एक थेंब बेबी ऑईल मिसळून शरीरावर लावा. त्वचेत एक वेगळीच चमक दिसून येईल. चेहऱ्यावर रोज चंदन पावडर, गुलाबपाणी व हळद मिसळून त्याचा लेप लावावा. यामुळे आपल्या चेहऱ्याचा रंग उजळतो.

## सल्ला

✼ किडलेली दाढ दुखत असेल तर ओवापूड दाढेत ठेवावी. लवंगेचा अर्क अगर लवंग पूड बोळ्यात घालून दाढेत धरावा.

✼ एक बदाम उगळून दुधामध्ये मिसळून प्यावे. यामुळे अपार बल मिळते. बदाम उगाळूनच उपयोगात घ्यावा. मुलांना त्याचा फायदा होतो.

## वास्तू

✼ पूर्वेकडे लाकडी ड्रॅगन असल्यास सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. घरात दक्षिण दिशेस जागा नसेल आणि त्यामुळे घरातील जड यंत्रसामग्री त्या ठिकाणी बसू शकत नसेल तर कमीत कमी कुटुंबप्रमुखाचे कपाट, त्याची दैनंदिन जीवनातील वापराची उपकरणे तरी या दिशेस नक्कीच ठेवावीत.

✼ किचनमध्ये काळ्या रंगाचे ग्रॅनाईट वापरू नये. याचा नकारात्मक प्रभाव कुटुंबातील महिलांवर पडतो.

✼ किचनमध्ये थोडीशी उघडी जागाही असावी, ज्यामुळे किचनमधील धूर, गॅस, उष्णता सहजपणे बाहेर निघू शकेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. १७ ऑगस्ट २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, श्रावण कृष्णपक्ष, रोहिणी २७।१८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ** : काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मिथुन** : हातावर हात ठेवल्याने कोणतेही कार्य होत नाही. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका. आपल्या उतावीळ स्वभावाला आज नियंत्रीत करावे.

**कर्क** : शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरूवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार करा. पत्नीकडून उत्तम वैवाहिक सुख प्राप्ती होईल.

**सिंह** : वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. मुले व पत्नीचा सहवास लाभेल. दिवस चांगला जाईल.

**कन्या** : कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. दिवस आनंदात जाईल. आपला चंचल स्वभाव मात्र स्थिर ठेवावा.

**तूळ** : भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैसे देण्याच्या बाबतीत जपून वागावे लागेल.

**वृश्चिक** : वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. आज कुणालाही आर्थिक मदत करू नका. वाहने व यांत्रिक उपकरणे सावधगिरीने हाताळावीत.

**धनु** : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. पैसे बुडण्याची शक्यता अथवा फसवणूक होऊ शकेल.


**मकर** : सामान्य स्थितीत मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात. महत्त्वाची कामे आज करू नयेत. सार्वजनिक ठिकाणी मानसन्मान मिळेल.

**कुंभ** : प्रेम व रोमांसच्या प्रकरणांमध्ये यश मिळेल. मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**मीन** : कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. जुनी मित्र–मैत्रिणी भेटतील. आपला प्रामाणिक स्वभाव असल्यामुळे कामे पूर्ण होतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**


## शब्दगंध क्र. ७२४३ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :–** १) विनाश करणारे; विध्वंसक ४) लहान मुलाचा मुका ६) स्वत:ला (एकवचनी) ७) उठाठेव; पाहुणचार; आदरातिथ्य १०) शेवट; वाद्य वाजविल्यानंतर त्याचा काही काळ राहणारा आवाज ११) धोबी; परीट १२) कमी करणे; काटकसर १३) एक प्रवासी वाहन १६) एक मोगल राजा १८) अपमान; मानखंडना; अवमान २०) अनेक केस किंवा तंतू यांचा समुदाय २१) सावध; हुशार २३) ऐतिहासिक विद्यापीठ असलेले बिहारमधील एक ठिकाण २४) किरकिर; डोकेदुखी

**उभे शब्द :–** १) शुद्ध; निर्मळ २) अपात्र; अयोग्य; लायक नसलेला ३) सर्कस वगैरेतील शरीराच्या विशिष्ट हालचाली; व्यायाम ४) एक द्रवरूप धातू ५) नोकर; चाकर; दास ८) तीन गुणांपैकी एक; धूळ ९) निरर्थक बोलणे; वटवट १४) निमित्त; कारण १५) आराधना; पूजा १६) अव्यवस्था; गोंधळाची स्थिती; बोजवारा १७) भात शिजताना होणारा आवाज १९) साठ मिनिटांचा काळ; २२) विशिष्ट समूह; कंपू घंटा

शब्दगंध क्र. ७२४२ चे उत्तर



फिल्मीचक्कर क्र. १२०१ चे उत्तर



# ✼ ✼ ✼ ✼ ✼ ✼ मुलांचे विश्व ✼ ✼ ✼ ✼ ✼ ✼

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : महान लोक त्यांच्या नम्रतेने लीन बनतात. – **कन्फ्यूशियस.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पोपटाला पेरू हे फळ का प्रिय आहे?

पोपटाला पेरू हे फळ आवडण्यामागे काय कारण आहे जाणून घ्या. पोपटांना पेरूची गोड आणि रुचकर चव आवडते. पेरू विविध रंगांमध्ये उपलब्ध असल्याने, पोपटांना ते आकर्षक वाटतात. पेरूमध्ये भरपूर पाणी आणि पोषक तत्वे असतात. पोपटांना या फळातून आवश्यक ऊर्जा मिळते आणि त्यांचे आरोग्य चांगले राहते.

पोपटांच्या आहारात बिया महत्वपूर्ण असतात. पेरूमध्ये बिया असतात, ज्यामुळे पोपट त्यांना आवडीने खातात. पेरू हे पोपटांच्या पचनसंस्थेसाठी चांगले मानले जाते आणि ते त्यांच्यासाठी एक सुरक्षित आणि पौष्टिक फळ आहे. या कारणांमुळे पेरू हे पोपटांसाठी एक अत्यंत आवडते आणि पौष्टिक फळ मानले जाते.

पेरूमध्ये 'बी' आणि 'सी' जीवनसत्वे असतात, ज्यामुळे पोपटांच्या आरोग्यासाठी ते फायद्याचे ठरते. या सारख्या अनेक कारणांमुळे पोपट या पक्षाला पेरु हे फळ प्रिय आहे.

## खरा भक्तीभाव

एकदा काशीमधील मोठे तपस्वी शांताश्रम स्वामी यांचे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्याशी पुढील संभाषण झाले.

**स्वामी** : महाराज, इतके लोक काशीत गंगास्नान करूनही पावन का होत नाहीत ?

**गोंदवलेकर महाराज** : कारण त्यांच्यामध्ये खरा भाव नाही !

**स्वामी (उत्तर न पटल्याने)** : त्यांच्यात खरा भाव असल्याविना ते कसे येतील ?

**गोंदवलेकर महाराज** : ते लवकरच दाखवीन.

नंतर चार दिवसांनी गोंदवलेकर महाराजांनी शांताश्रमस्वामींच्या हातापायांना चिंध्या गुंडाळून त्यांना महारोग्याचे रूप दिले आणि जेथे पुष्कळ लोक गंगास्नानासाठी उतरत, तेथे त्यांना नेऊन बसवले. महाराज स्वतः बैराग्याचा वेश धारण करून त्यांच्या शेजारी उभे राहिले.

काही वेळाने बरीच मंडळी जमली. बैरागी उपस्थितांना म्हणाला, लोकहो, ऐका ! हा महारोगी माझा भाऊ आहे. गेल्या वर्षी आम्ही दोघांनी विश्वेश्वराची अत्यंत मनापासून सेवा केली. तेव्हा त्याने प्रसन्न होऊन भावाला वर दिला, 'या गंगेमध्ये स्नान केल्यावर आपले पाप नाहीसे होऊन आपण शुद्ध झालो, असा भाव असलेल्या यात्रेकरूने तुला एकदा आलिंगन दिले, तर तुझा रोग नाहीसा होईल.' येथे आपण इतके जण आहात, कोणीतरी माझ्या भावावर एवढा उपकार करावा !

बैराग्याचे बोलणे ऐकून गर्दीतील ८–१० लोक पुढे सरसावले. त्या क्षणी बैरागी त्या लोकांना थांबवून म्हणाला, क्षणभर थांबा ! विश्वेश्वराने पुढे असेही सांगितले आहे,

'जो यात्रेकरू याला आलिंगन देईल, त्याला तो रोग लागेल, पण त्याने पुन्हा गंगेत स्नान केल्यावर त्याचा भाव शुद्ध असल्यामुळे तो रोगमुक्त होईल. असे सांगितल्यावर सर्व जण निघून गेले; मात्र तेथील एका तरुण शेतकऱ्याने अधिक विचार न करता मोठ्या निष्ठेने शांताश्रमस्वामींना आलिंगन दिले. त्यानंतर लगेच गोंदवलेकर महाराजांनी स्वतः हून शेतकऱ्याला आलिंगन दिले आणि ते उद्गारले, बाळ, तुझी काशीयात्रा खरी फळाला आली. तुझ्या जन्माचे कल्याण झाले, असे निश्चित समज !

शांताश्रमस्वामींना या सगळ्या प्रसंगाचा अथ आपोआपच कळला.

## जीवन का अमृत (भाग १)



### गुरू और परमात्मा

हम चाहे अपने आपको बहुत बलवान समझें, फिर भी हम में बहुतसी कमजोरियाँ हैं । जब तक इंसान अपनी कमजोरियों की ओर ध्यान नहीं देता, वह बेहतर नहीं हो सकता । जब तक इंसान अपने आपको बलवान, बुद्धिवान और खूबसूरत समझता रहे, तब तक वह परमात्मा को पा नहीं सकता क्योंकि यह सब बाहर की बनावट है, कुछ शारीरिक, कुछ मानसिक (mental) । यहाँ गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं कि हमारा असली रूप, हमारी आत्मा सचखंड की वासी है । उसका निजधाम यह दुनिया नहीं है, वह यहाँ पर परदेसी है, बहुत दूर से आई है और जब वह अपने घर को छोड़कर यहाँ आई, तो वह इस माटी के रंग में रंग गई । वह आत्मा जो बहुत खूबसूरत है, चेतन है, प्रभु के प्रेम से भरपूर है, बलवान है क्योंकि ज्योति से भरपूर है । (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

### आज्ञा चक्र

'अमेरिगो मॉस्का' नामक इटालियन रसायन वैज्ञानिक ने कहा है कि खेती में इस्तेमाल की जाने वाली कीटनाशक, जंतुनाशक दवाइयाँ इतनी भयानक हैं जो जीन्स में बदलाव करनेवाली अणु–विस्फोटक से निर्माण होनेवाली रेडियो एक्टीव मूलद्रव्य के समान है। झेलिब, फल्तान, कप्तान जैसी फफूंदीनाशक दवाइयों के इस्तेमाल से हर वर्ष इतना नुकसान होता है, जितना १४ मैग्रेट के १९ हाइड्रोजन बॉम्ब गिरने पर नुकसान होता है। इसके परिणामस्वरूप अमेरिका में १५ प्रतिशत बालक मानसिक विकलांगता के साथ जन्म ले रहे हैं । इसके अलावा वनस्पति, प्राणी और जमीन में जो बीमारियाँ और प्रदूषण बढ़ रहा है इसका हम अंदाजा भी नहीं लगा सकते हैं इतना यह भयानक है । क्लोरिनेटेड, हाइड्रोकार्बन, डी.डी.टी., पी.सी.बी. के द्वारा अमेरिका के युवकों में नपुंसकता का प्रमाण बढ़ रहा है ।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास – 'टर्निंग पॉईंट'

जून १९८८ साली माझ्या मामाने मला कायनेटिक कंपनीत हेल्पर म्हणून लावलं. स्पेअर पार्ट डिपार्टमेंटमध्ये काम करु लागलो त्यावेळी मी एफ वाय बी कॉम मध्ये (अहमदनगर महाविद्यालय) शिकत होतो. सकाळी सव्वासात वाजता निघायचो. संध्याकाळी सहा वाजता घरी आलो की अकाऊंटसच्या क्लासला जायचो. इच्छा असुनही कॉलेजला जाऊ शकलो नाही. परंतु त्यावेळी बुधवारी साप्ताहिक सुट्टी कंपनीला होती. फक्त बुधवारी कॉलेजमध्ये जायचो. कमवा आणि शिका ह्या धोरणानुसार शिक्षण घेतलं. बी. कॉम. फर्स्ट क्लास श्रेणीत उत्तीर्ण झालो. रोजीरोटी होती पण सरकारी नोकरी करायचीच हे ठाम ठरवलेलं होतं म्हणून प्रयत्न करायचो. त्यावेळी कंपनीत साधारण नऊशे रुपये महिना पगार होता. भारतीय आयुर्विमा महामंडळाची जाहिरात वाचली. अर्ज व शुल्क पाठवले. लेखी परिक्षेला काही लाखात मुलं होती. लेखी परिक्षा पास झालो. नंतर टायपिंगची परिक्षा पुन्हा पुण्यात दिली. पास झालो, शेवटी इंटरव्हवुला काही हजार मुलं, मुली होत्या. इंटरव्ह्यु चांगला झाला. त्यापुर्वी ए.आय. आय. इ. ए. ह्या संघटनेच्या सदस्यांनी आमची इंटरव्ह्युची तयारी करुन घेतली. त्याचा फायदा झाला. टायपिस्ट म्हणून जानेवारी १९९२ मध्ये शेवगावला हजर झालो आणि आयुष्याला चांगल्या अर्थाने वळण मिळालं. मला वाटतं प्रत्येकाच्या आयुष्यात टर्निंग पॉईंट येतो अथवा आणावा लागतो. तोच टर्निंग पॉईंट मी निश्चित करुन आणला. हा टर्निंग पॉईंट येण्याचं अत्यंत महत्वाचं कारण म्हणजे शिक्षणावर मनापासून केलेलं प्रेम. अर्थात मनापासून केलेला अभ्यास. सरकारी नोकरी करायचीच हा मनापासून घेतलेला ध्यासच आपल्यासाठी टर्निंग पॉईंट असतो. नेमका टर्निंग पॉईंट कोणता आहे ? तो येईल का ? आणु शकतो का ? समजा आणावयाचा असेल तर मी नेमकं काय अथवा काय–काय केलं पाहिजे ? टर्निंग पॉईंट एखाद्या व्यक्तीमुळे येईल की एखाद्या घटनेमुळे येईल ? एखादा टर्निंग पॉईंट येऊन गेलाय का? मी तो टर्निंग पॉईंट का ओळखु शकलो नाही ? टर्निंग पॉईंट व्यायामामुळे येईल ? की वाचनामुळे ? पैश्यांमुळे येईल की पैश्यांशिवाय येईल ? एखाद्या नातेवाईकामुळे येईल ? की एखाद्या परिचितामुळे येईल ? टर्निंग पॉईंट नेमका ओळखायचा कसा? हे असे आणि ह्यांसारखे अनेक प्रश्न मनात येऊ लागतात अशावेळी आधी स्वतःचं मन आणि तन शांत करणं गरजेचं असतं.

माझ्याशी एका परिचिताला मी नेहमी सांगायचो की तू 'ते' व्यसन करु नको पण तो ऐकायचा नाही. किंवा ऐकलंच तर दोन–चार दिवस चांगलं वागायचा पुन्हा पहिल्यासारखं व्यसन चालु. शेवटी मी त्याच्याशी बोलणं बंद केलं. त्याला भेटणं बंद केलं. ह्या मागचा उद्देश असा की निदान तो, विचारपूर्वक, व्यसन न करता वागेल, राहील. पण व्यर्थ आणि एके दिवशी त्याचा अपघात झाल्याचं कळालं. उजवा पाय निकामी झाला. तो हॉस्पिटलमध्ये असतांना सर्वतोपरी सहकार्य आम्ही मोजक्या मित्रांनी केलं. जोपर्यंत दवाखान्यात होता तोपर्यंत ज्या–ज्या वेळी मी त्याला भेटलो त्या त्या वेळी तो फक्त रडला. त्याला झालेला पश्चाताप, त्याचा नसलेला उजवा पायच टर्निंग पॉईंट ठरला. अर्थात आपलं नुकसान होणार आहे, हे समोरची व्यक्ती समजुन, उमजुन सांगत असते तेव्हा तो व्यसनाच्या अधिन झाल्यामुळे ऐकलं नाही पण स्वतःचं नुकसान होणार हे माहित असुनही चुक करणारंच असाल तर ह्याच्याइतकं वाईट काहीच असुन शकत नाही. एका कॉलेजने सलग दुसऱ्या वर्षीही मला मोटिव्हेशनल लेक्चरकरिता बोलावलं. दुसऱ्या वर्षीही प्रेरणादायी संवाद व्याख्यान छान झालं. मागील वर्षी ज्या दोन विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी संवाद व्याख्यान ऐकलं होतं ते मला प्राचार्यांच्या केबिनमध्ये येऊन भेटले. म्हणाले,'आम्ही दोघांनी तुमच्या मागच्या वर्षी व्याख्यानानंतर मोबाईलचा वापर अत्यंत कमी अर्थात फक्त गरजेपुरताच केला. अवांतर वाचन केलं हेच अवांतर वाचन आमच्यासाठी नक्कीच भावी आयुष्यासाठी टर्निंग पॉईंट ठरणार आहे.' मी त्या मुलांशी हस्तांदोलन केलं. त्यांचं अभिनंदन करुन मनापासून शुभेच्छा दिल्या. कुणाचं तरी चांगलं होण्यासाठी आपण स्वतः, आपल्या मुखातुन इतरांना प्रेरणा देणारे शब्द हासुध्दा एक टर्निंग पॉईंटच आहे. एखादी व्यक्ती भलेही ती रक्तनात्याची असो अथवा नसो जेव्हा तळमळीने सांगते तेव्हा ऐका कारण त्या व्यक्तीला माहित असतं की आपलं तळमळीनं सांगणं हाच टर्निंग पॉईंट (चांगल्या अर्थाने) आहे. वेळ हा सर्वात बलवान टर्निंग पॉईंट आहे. वेळेची कदर कराल तर चांगले दिवस आल्याशिवाय राहणार नाहीत. तुमच्या आयुष्यातला एखादा टर्निंग पॉईंट अवश्य सांगा. बऱ्याचदा टर्निंग पॉईंट आणावाच लागतो. (लेख क्र.५६३)

– **सुनील राऊत** माळीगल्ली,
भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : आई दिवाळीला मि ह्या दुकानातुन फटाकड्या घेणार
आई : नालायक हे फटाकड्याचं दुकान. नाहीये मुलींचे हॉस्टेल आहे.
मुलगा : मला काय माहित पप्पा एकदा म्हणत होते हितं एका पेक्षा एक फटाकडया आहेत
आई : हो का... अत्ता घरी गेल्यावर पप्पा बघ कसे रॉकेट सारखे आकाशात उडतील...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✼ सीआरपीएफ महासंचालकपदी कोणाची नियुक्ती झाली आहे?
– ज्ञानेंद्रप्रताप सिंह

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदीय बालसंस्कार

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

कटू (तिखट), तिक्त (कडू) व कषाय (तुरट) या रसांनी युक्त पदार्थ आहारामध्ये जास्त प्रमाणात वापरावेत. तिखट, कडू व तुरट रस कफ कमी करणारे असल्याने या रसांचे पदार्थ आहारात वापरणे आरोग्यासाठी हितकारक आहे. यासाठी आहारामध्ये तूर, मूग, मसूर, हरभरा या डाळींचा व कडधान्यांचा वापर करावा. मुगाचे कढण, मसुराची आमटी, कुळथाची, मटकीची उसळ, कुळथाचे शेंगुळे, सूप अशा प्रकारे विविध आहारीय पदार्थ बनवावेत. तसेच या ऋतूमधली सर्व फळे खावीत.

उदाहरणार्थ : आवळा, कवठ अशी तुरट रसांची फळे या ऋतूत खावीत. या फळांमुळे कफाचे प्रमाण कमी होते. कारण जलचर प्राण्यांमुळे कफप्रकोप होतो. त्याऐवजी चिकन, मटण असा मांसाहार घ्यावा, परंतु याचे प्रमाण कमी असावे.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# बांधकाम क्षेत्रातील हिशोब व्यवस्थापन आणि रेरा कायद्याचे महत्त्व

भारतातील बांधकाम उद्योग हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. मात्र, गेल्या काही दशकांत या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनियमितता, अपारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांच्या फसवणुकीच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, सरकारने २०१६ मध्ये 'रिअल इस्टेट रेग्युलेटरी ॲथॉरिटी' (RERA) कायदा लागू केला. या कायद्यामुळे बांधकाम प्रकल्पांच्या आर्थिक व्यवस्थापनात शिस्तबद्धता आणि पारदर्शकता आली आहे. यामुळे हिशोब व्यवस्थापनाचे महत्त्व अधिक वाढले आहे, आणि तांत्रिक ज्ञानासह वाणिज्य शिक्षण असलेल्या प्रशिक्षित लोकांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

**रेरा कायद्याचा आर्थिक व्यवस्थापनावर प्रभाव :**

रेरा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे बिल्डर्स आणि कॉन्ट्रॅक्टर्स यांना आर्थिक हिशोब व्यवस्थापनाच्या अनेक डेडलाईन्स पाळाव्या लागत आहेत. प्रत्येक प्रकल्पासाठी वेगवेगळ्या आर्थिक दस्तऐवजांची आवश्यकता असते, जसे की –

अ) प्रकल्पाची अंदाजपत्रक निर्मिती आणि खर्च नोंद

ब) प्रकल्पातील निधीचा वापर आणि आर्थिक प्रवाह व्यवस्थापन

क) कर (GST, TDS, Income Tax) नियमांचे पालन

ड) प्रकल्पाच्या आर्थिक स्थितीचा ताळेबंद आणि ऑडिट

ई) यासाठी प्रगत सॉफ्टवेअर प्रणालींचा वापर अनिवार्य झाला आहे.

**बांधकाम क्षेत्रातील प्रमुख लेखा सॉफ्टवेअर :**

हिशोब व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी आणि आर्थिक व्यवहारांची स्पष्ट नोंद ठेवण्यासाठी आधुनिक सॉफ्टवेअर प्रणाली मोठ्या प्रमाणावर वापरण्यात येत आहेत.

**Tally ERP ९ आणि Tally Prime** – हे सर्वाधिक प्रचलित सॉफ्टवेअर असून बिल्डर्स आणि ठेकेदारांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. यामध्ये GST, TDS, आणि बँक रीकॉन्सिलिएशन यांसारखी वैशिष्ट्ये उपलब्ध आहेत.

**SP आणि QuickBooks** – मोठ्या प्रकल्पांसाठी आणि कंपन्यांसाठी एठ्झ प्रणालीद्वारे आर्थिक व्यवस्थापन करण्यात मदत करणारी सॉफ्टवेअर प्रणाली.

**Zoho Books आणि Marg ERP** – मध्यम आणि लहान प्रकल्पांसाठी उपयुक्त क्लाउड–बेस्ड सॉफ्टवेअर.

**Excel** आणि **Cloud-Based ccounting Software -** लहान आणि नवोदित बिल्डर्ससाठी साधे पण प्रभावी पर्याय.

**चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) यांची भूमिका आणि त्यांच्या मर्यादा :**

बांधकाम उद्योगातील हिशोब व्यवस्थापनामध्ये चार्टर्ड अकाउंटंट्स **(C.A.)** महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहे –

अ) प्रकल्पांचे आर्थिक ऑडिट आणि कर नियोजन

ब) GST आणि TDS नियमांची अंमलबजावणी

क) बिल्डर्ससाठी कर आणि आर्थिक सल्ला

ड) बँक आणि वित्तीय संस्थांसाठी आर्थिक दस्तऐवज तयार करणे

मात्र, प्रत्यक्ष डेटा एंट्री करणे, रोजच्या आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन करणे हे त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नाही. त्यामुळे डेटा एंट्री आणि सॉफ्टवेअर ऑपरेटिंग करणाऱ्या व्यक्तींची गरज भासू लागली आहे.

**प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता आणि संधी :**

बांधकाम उद्योगातील हिशोब व्यवस्थापनासाठी वाणिज्य शिक्षणासोबतच तांत्रिक ज्ञान आवश्यक आहे. मात्र, या क्षेत्रात अशा कौशल्य असलेल्या लोकांची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे या उद्योगात नव्याने प्रशिक्षित मनुष्यबळाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. विशेषतः Tally आणि इतर लेखा सॉफ्टवेअर हाताळणाऱ्या व्यक्तींची मागणी वाढत आहे.

**रेरा कन्सल्टंट आणि C.A. यांच्यातील परस्परावलंबन :**

रेरा कायद्यांतर्गत हिशोब व्यवस्थापन करताना केवळ C.A. ना माहिती असणे पुरेसे नाही, तर रेरा कन्सल्टंटलाही आवश्यक आर्थिक माहिती असावी लागते. यामुळे दोन्ही क्षेत्रांची माहिती असलेल्या व्यक्तींची मागणी वाढली आहे. बिल्डर होण्यासाठी कोणत्याही कायदेशीर पात्रतेची आवश्यकता नसल्याने अनेक नवशिके व्यावसायिक या क्षेत्रात येत आहेत, त्यामुळे प्रशिक्षित आणि जाणकार लोकांची मागणी वाढली आहे.

**बांधकाम उद्योगात MEP प्रमाणे हिशोब विश्लेषकांची गरज :**

बांधकाम प्रकल्पांसाठी MEP (Mechanical, Electrical, Plumbing) तज्ञ आवश्यक असतात. त्याचप्रमाणे, आर्थिक व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित हिशोब विश्लेषकांचीही गरज निर्माण झाली आहे. भविष्यात हा एक स्वतंत्र व्यवसाय म्हणून विकसित होऊ शकतो. यामुळे या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत.

**बांधकाम उद्योगातील कर व्यवस्थापन आणि डेडलाईन्स :**

बिल्डर, डेव्हलपर, सरकारी आणि खाजगी कंत्राटदार यांना विविध कर नियम आणि डेडलाईन्स पाळाव्या लागतात. यामध्ये –

GST (Goods and Services Tax) - प्रत्येक प्रकल्पाला जीएसटी नियमांचे पालन करावे लागते.

Income Tax (आयकर) – बांधकाम व्यावसायिक आणि कर्मचार्यांच्या उत्पन्नावर लागू होणारे नियम.

TDS (Tax Deducted at Source) – ठरावीक व्यवहारांवर टीडीएस कपात बंधनकारक आहे.

Provident Fund आणि Profession Tax – कामगारांच्या वेतन व्यवस्थापनासाठी आवश्यक.

Insurance (विमा) – कामगार आणि प्रकल्प सुरक्षेसाठी महत्त्वाची बाब.

**भविष्यातील संधी आणि नवीन सेवा संकल्पना :**

बांधकाम व्यावसायिकांसाठी पूर्णवेळ C.A. ठेवणे शक्य नसते. त्यामुळे रेडी डेटा आणि लेखापरीक्षण सेवा पुरवणाऱ्या स्वतंत्र सेवा कंपन्या उदयास येऊ शकतात.

तसेच, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रातील तांत्रिक शिक्षण देणारे प्रशिक्षण केंद्र सुरू होण्याची शक्यता आहे. यामुळे नवीन करिअर संधी निर्माण होतील आणि हिशोब व्यवस्थापन अधिक सक्षम होईल.

बांधकाम क्षेत्रात हिशोब व्यवस्थापन, रेरा कायदा आणि वाणिज्य क्षेत्राची माहिती असलेल्या व्यक्तींसाठी मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होत आहेत. भविष्यात हा एक स्वतंत्र व्यवसाय किंवा सेवाक्षेत्र म्हणून विकसित होऊ शकतो. प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास, या क्षेत्रातील अडचणी सुटतील आणि बांधकाम उद्योग अधिक शिस्तबद्ध आणि पारदर्शक बनेल.

**लेखक अरविंद रघुनाथ वाबळे** यांचा बांधकाम क्षेत्रातील ३० वर्षांचा अनुभव असून त्यातील अकाऊंटिंगमधीलही सुमारे १२ वर्षांचा अनुभव आहे. गेली काही वर्षे ते खास Account Writing, Maintaining आणि प्लॅनिंग व अंदाजपत्रक (Planning Estimate) यांत व इतरही काही क्षेत्रांत कार्यरत आहेत.



Civil Desk
04, Mauli Estate, Shilavihar Road, Shriram Chowk,
Savedi, Ahilyanagar
cell : 9763704173, arvindwable@23gmail.com
deskofcivil@gmail.com

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

# जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत वैशाली मरकड प्रथम



नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शिक्षण महर्षी स्वर्गीय माधवराव मुळे प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत येथील रेसिडेन्शियल हायस्कूलच्या उपशिक्षिका सौ. वैशाली किशोर मरकड यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे. प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बक्षीस समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील हे होते.

यावेळी मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देण्यात आले. यावेळी आयोजित निबंध व चित्रकला स्पर्धेमध्ये जिल्ह्यातून शालेय गटातून व खुल्या गटातून तीन हजाराच्या पुढे स्पर्धक सहभागी झाले होते.

यावेळी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे खजिनदार प्रकाश गांधी, मुळे प्रतिष्ठानचे अध्यक्ष व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे विश्वस्त मुकेश मुळे, उपाध्यक्ष दत्ता नारळे, सचिव प्राचार्य एम. एम.तांबे, डॉ. महेश मुळे, डॉ.बापूसाहेब पोटे, डॉ. मीनाताई पोटे आदी उपस्थित होते.



## प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये वृक्षारोपण

प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रीन क्लब उपक्रमांचा एक भाग म्हणून, सामुदायिक विकास आणि पर्यावरण संवर्धन, पर्यावरण जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने कॉलेज कॅम्पसमध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमानिमित्त महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कॉलेजचे प्राचार्य महेश भालसिंग, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाचे कॅम्पस डायरेक्टर पंजाबराव आहेर यांनी स्वागत केले.

# अहिल्यानगर महिला फुटबॉल संघाचा राज्य स्पर्धेत ऐतिहासिक विजय

**४० वर्षांनंतर तिसरा क्रमांक पटकाविण्याचा बहुमान**

नगर – पालघर येथे झालेल्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित वरिष्ठ महिला राज्य अजिंक्यपद स्पर्धा २०२५ मध्ये अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वरिष्ठ महिला संघाने ऐतिहासिक कामगिरी करत तिसरा क्रमांक पटकावला आहे. तब्बल ४० वर्षांनंतर संघाने ही कामगिरी केली आहे.



अहिल्यानगर महिला फुटबॉल संघाने राज्य स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला.

तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात अहिल्यानगरने दमदार खेळी करुन यवतमाळवर ४–० अशी एकतर्फी मात केली. स्पर्धेत या आधी संघाने सातारा वर ६–१, लातूर वर ३–० आणि गोंदिया वर ४–० असा दमदार विजय मिळवत उपांत्य फेरी गाठली होती. उत्कृष्ट एकजूट, आक्रमक खेळ आणि भक्कम बचावामुळे संघाने आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

अहिल्यानगर संघात राणी कदम (कर्णधार), प्रियंका आवारे, सोनिया दोसाणी, निकिता भिंगारदिवे, आयेशा सय्यद, श्रेया कावरे, सूर्या नयना, महिमा पाथरे, सुमैय्या शेख, तनिशा शिरसूळ, वैष्णवी रोकडे यांचा समावेश होता. संघ प्रशिक्षक म्हणून शशांक वाल्मिकी व संघ व्यवस्थापक म्हणून काजल वाल्मिकी काम पाहिले.

अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, अमरजितसिंह शाही, जोगासिंग मिन्हास, खालिद सय्यद, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहाय्यक खजिनदार रणबीरसिंग परमार, डॉ. सॅवियो वेगास सर्व पदाधिकारी व सदस्यांनी संघातील खेळाडूंचे अभिनंदन केले.

अहिल्यानगर महिला फुटबॉल संघाचे १५ ऑगस्ट रोजी रात्री उशीरा आगमन झाले.

यावेळी जिल्हा फुटबॉल संघटनेचे उपाध्यक्ष खालिद सय्यद, सहसचिव प्रदीप जाधव, विक्टर जोसेफ, सदस्य राजू पाटोळे, पल्लवी सैंदाणे, जेव्हिअर स्वामी, अभिषेक सोनवणे खेळाडूंचे पालक व शहरातील फुटबॉल प्रेमी यांनी खेळाडूंचे स्वागत केले. जिल्हा फुटबॉल संघटनेच्या वतीने सर्व खेळाडूंचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सन्मान स्विकारताना भारावून गेलेल्या खेळाडूंनी पुढील वर्षीच्या स्पर्धेमध्ये आणखी मेहनत घेऊन जिल्ह्यासाठी विजेतेपद मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. तर जिल्हा फुटबॉल संघटनेतर्फे देण्यात आलेल्या संधी आणि सोयी–सुविधाबद्दल खेळाडूंनी कृतज्ञता व्यक्त केली.

# जादुटोणा विरोधी कायद्याची जागृती जिल्ह्यात सर्वदूर करा

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे निर्देश**

नगर – जादुटोणा, अंधश्रद्धा व अघोरी प्रथा या समाजाच्या प्रगतीस अडथळा ठरतात. त्यांचे उच्चाटन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यासाठी जिल्ह्यात सर्वदूर जनजागृती करा, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केल्या.



जिल्हास्तरीय जादुटोणा विरोधी जनजागृती, प्रचार व प्रसार समितीच्या बैठकीत मार्गदर्शन जिल्हाधिकारी पंकज आशिया.

जिल्हास्तरीय जादुटोणा विरोधी जनजागृती, प्रचार व प्रसार समितीची बैठक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण प्रविण कोरगंटीवार, उपविभागीय पोलीस अधिकारी वैभव कलबुर्गे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डॉ. आशिया म्हणाले, महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्यासाठी व त्याचे समूळ उच्चाटन होण्यासाठी अधिनियम २०१३ जारी करण्यात आला आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणीसाठी समितीच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालयांत व्याख्याने व कार्यक्रमांचे आयोजन करावे. तसेच ग्रामीण भागातही या कायद्याबाबत प्रभावीपणे जागृती व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

# सावेडी येथील 'चंदुकाका ज्वेल्स्' मध्ये चलो दुबई स्किमला ग्राहकांचा प्रतिसाद




नगर – चंदुकाका ज्वेल्सने ग्राहकांसाठी चलो दुबई या स्किमचे आयोजन केले आहे. सर्वप्रथम आपण सदर योजनेस दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल धन्यवाद. या योजने अंतर्गत ५ ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीवर एक स्क्रॅच कार्ड मिळणार असून त्याव्दारे दुबई ट्रिप किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स मिळणार आहे. त्याचबरोबरच शोरूमने रू. २०००० च्या चांदीखरेदी किंवा रू. ५००० च्या फॉर्मिंग ज्वेलरी खरेदी किंवा रू. ५००० च्या कोणत्याही भिशी योजनेत सहभागी व्हा आणि स्क्रॅचकार्डव्दारे दुबई ट्रिप किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स मिळव्याची संधी ग्राहकांना दिली आहे. याव्दारे सुवर्णग्राहकांबरोबरच, चांदीखरेदी, फॉर्मिंग ज्वेलरी असो की भिशी प्रत्येक ग्राहकांना या योजनेत सामिल होण्याची व दुबई ट्रिप जिंकण्याची संधी दिली आहे. असे ज्वेल्सच्या व्यवस्थापकांनी दिली आहे.

खरेदी ही नेहमीच फायद्याची ठरावी व प्रत्येकाला एक भेटवस्तू मिळावी या हेतूने सदर स्किमचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच अर्थ सुवर्णखरेदी, चांदीखरेदी, फॉर्मिंग ज्वेलरी खरेदी किंवा भिशी योजनेत सहभागी झाल्यास हमखास गिफ्ट हे मिळणारच आहे. शिवाय दुबई ट्रिप जिंकण्याची संधीही..

खास सुवर्णग्राहकांसाठी विविध डिझाईन्समध्ये बकुळीहार, राणीहार, शाहीहार, नेकलेस, ठुशी, ताशीवमाळ, पाटल्या, बांगड्या, टॉप्स तसेच टेम्पल ज्वेलरी मध्ये बिंदी, बाजुबंद, टॉप्स्, झुमका, काप, नेकलेस, अंगठी, चोकर, पाटल्या, बांगड्या, ब्रासलेट, पदक व गंठणची श्रुंखला.. आपणांस हजर स्टॉकमध्ये उपलब्ध आहे. वाजवी दर, वाजवी मजुरी हे आमच्या सुवर्णदालनाचे वैशिष्ट्ये आहे.

खास चांदीमधील ताट, वाटी, चमचा, फुलपात्र, पुजा सेट अशी विविध प्रकारची, वेगवेगळ्या वजनाची चांदीची भांडी येथे उपलब्ध आहेत. रक्षाबंधनानिमित्त खास सोन्या–चांदीच्या राख्या आकर्षक पॅकिंगमध्ये व वेगवेगळ्या वजनात मोठे कलेक्शन आपल्यासाठी सादर केले आहेत.

प्रत्येक ग्राहकाला सोने खरेदीवर काहीतरी गिफ्ट मिळायला हवे या उद्देशाने सदर स्किमचे आयोजन करण्यात आले आहे. सुवर्णसमृध्दी योजनेव्दारे मोठी सुवर्णखरेदी करता येणे शक्य होणार आहे. येथील सुवर्णखरेदी केलेल्या दागिन्यांची मोडतेवेळी कोणत्याही प्रकारची घट धरली जात नाही. या स्किममुळे ग्राहकांना बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे. तेव्हा सुवर्णखरेदी आजच चंदुकाका ज्वेल्स्, सावेडी येथील आपल्या हक्काच्या सुवर्णदालनातून करा आणि बक्षिसे जिंका असे आवाहन संचालकांनी केले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही शत प्रतिशत महायुतीच्या विजयाचा निर्धार करा

**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आवाहन; भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन**

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत देश आत्मनिर्भरतेने यशस्वी प्रवास करीत आहे. विश्वामध्ये सर्वाधिक सदस्य असलेल्या कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन पक्षाकडे आहे. आगामी काळात हिंदुत्वाच्या विचाराने कार्यकर्त्यांची ताकदच देशाला बलशाली बनवेल असा विश्वास व्यक्त करतानाच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही शत प्रतिशत महायुतीच्या विजयाचा निर्धार करा असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील.

भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब सानप यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी आ.संग्राम जगताप, जिल्ह्याचे अध्यक्ष दिलीप भालसिंग, शहराचे अध्यक्ष अनिल मोहीते, उत्तरचे अध्यक्ष नितीन दिनकर यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. रक्षाबंधनाच्या निमिताने महीला मोर्च्याच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी संकलीत करण्यात आलेल्या राख्या पालकमंत्री विखे पाटील यांच्याकडे सुपूर्त करण्यात आल्या.

याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, तिसऱ्यांदा पंतप्रधान होण्याचा बहुमान नरेंद्र मोदीजीना मिळाला. राज्यातही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीला सत्ता मिळाली. भाजप सर्वाधिक जागा जिंकून क्रमांक एकचा पक्ष ठरला आहे. लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीने नकारात्मक प्रचार करुन, मतदारांची दिशाभूल केली मात्र विधानसभा निवडणूकीत महायुतीच्या संघटीत प्रयत्नांमुळे मोठे यश आपल्याला मिळू शकले. जगात सर्वाधिक सदस्य संख्या असलेला पक्ष म्हणून भाजपाची ओळख आहे. विचारांच्या आधारावर आणि कार्यकर्त्यांचे मजबूत संघटन हीच पक्षाची खरी ताकद असल्याचे सांगून मंत्री विखे पाटील म्हणाले की, अंत्योदयाच्या मंत्रापासून पक्षाचा सुरू झालेला प्रवास आज देशाला आत्मनिर्भरतेच्या दिशेने घेवून जात आहे. कश्मिर मधील ३७० वे कलम रद्द करून या प्रदेशाला विकासाच्या प्रक्रीयेत आणण्याचा ऐतिहासिक निर्णय असो की, नुकत्याच घडलेल्या पहेलगाम घटनेनंतर भारताने पाकीस्तानी अतिरेक्यांचे अड्डे उध्वस्त करण्याची घेतलेली भूमिका भारताच्या सामर्थ्याची ताकद दाखवून देणारी ठरली असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

**अवैध धंदे आणि अतिक्रमणाबाबत पोलीस प्रशासनाला योग्य सूचना**

आ.संग्राम जगताप यांनी हिंदुत्वाच्या घेतलेल्या भूमिकेचे स्वागत करून मंत्री विखे पाटील म्हणाले की हिंदूत्वाचा विचारच भारताला बलशाली बनविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. शहरातील अवैध धंदे आणि अतिक्रमणाबाबत पोलीस प्रशासनाला योग्य सूचना दिल्या आहेत. आगामी काळात अतिक्रमणाची मोहीम पुन्हा सुरू करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती म्हणून एकत्रितपणे निवडणुका लढवायच्या असल्याने त्याची तयारी सुरू करण्याचे आवाहन त्यांनी केले.

आ.संग्राम जगताप यांनी बाळासाहेब सानप यांच्या राजकीय वाटचालीचा आढावा घेवून त्यांनी दाखवलेल्या धाडसामुळे राज चेंबर्सचे नाव टिकून राहीले असल्याचे सांगितले. मंत्री विखे पाटील यांनी अतिक्रमण काढण्याची मोहीम शहरात राबवली गेल्यामुळेच या भागातील वातावरण चांगले झाले असल्याचे त्यांनी सांगितले. आ.संग्राम जगताप यांनीही विरोधी आघाडी करुन, व्होट चोरीच्या संदर्भात केल्या जाणाऱ्या आरोपांचा समाचार घेतला. याप्रसंगी बाळासाहेब सानप, अनिल मोहीते, गीताताई गिल्डा यांनी मनोगत व्यक्त केले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आरोग्यसेवेचे व्रत जोपासले जाते

### उत्तमचंद मंडलेचा यांचे विचार; बालकांची मोफत आरोग्य तपासणी

नगर – समाजातील लहान बालकांपासून ज्येष्ठांपर्यंत आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्यदूत बनला आहे. समाजाच्या सदृढ आरोग्याचा वसा घेऊन सेवाभावाने आरोग्यसेवेचे व्रत या हॉस्पिटलमध्ये जोपासले जात आहे. अध्यात्मतेची जोड असलेल्या आरोग्याचा वसा सेवाभावी वृत्तीने सुरु असून, या सेवा कार्याला हातभार लावून ईश्वरपूजेचा समाधान मिळत असल्याची भावना उत्तमचंद मंडलेचा यांनी व्यक्त केली.



जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोफत बालरोग तपासणी शिबिराचे दीपप्रज्वलन करताना उत्तमचंद मंडलेचा आदी.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मोफत बालरोग तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मंडलेचा बोलत होते. याप्रसंगी किशोरकुमार जैन, अनिताताई जैन, संयम जैन, पियुष मंडलेचा, परेश मंडलेचा, राजेंद्र ताथेड, पोपट लोढा, शांतीलाल संकलेचा, पंकज नाबरिया, प्रफुल भंडारी, सतीश (बाबुशेठ) लोढा, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, बालरोगतज्ञ डॉ. गणेश गव्हाणे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दीप्ती अग्रवाल आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रकाश छल्लाणी म्हणाले की, मंडलेच्या परिवाराने सातत्याने आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्यसेवेच्या कार्यात हातभार लावला आहे. उच्च सुशिक्षित असलेला हा परिवार सेवा कार्याशी जोडला गेलेला आहे. हॉस्पिटलमध्ये सर्वाधिक मोफत डायलिसिस आणि गरजूंवर अल्पदरात हृदयाचे शस्त्रक्रिया केल्या जात आहे. समाज निरोगी रहावा आणि सर्वसामान्यांना आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने मिशन म्हणून सेवा कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

पियुष मंडलेचा म्हणाले की, आरोग्यसेवा समाजाच्या अंतिम घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करत असून, या सेवा कार्यात मंडलेचा परिवाराचे नेहमीच योगदान राहणार आहे. या रुग्णसेवेतून सर्वसामान्यांना जगण्याची उमेद मिळत असल्याचे ते म्हणाले.

राजेंद्र ताथेड यांनी शिबिराला शुभेच्छा दिल्या. किशोरकुमार जैन यांनी हॉस्पिटलच्या सेवा कार्याचे कौतुक करुन, सर्वसामान्यांना उपचारासाठी आधार मिळत असल्याचे स्पष्ट केले.

डॉ. गणेश गव्हाणे म्हणाले की, कृष्ण जन्माष्टमीच्या पावन दिवसाला होत असलेले हे शिबिर एक पर्वणी म्हणून आहे. लहान बालकांच्या आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वीत असून, तज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम सेवा देत आहे. २६ बेडच्या अद्यावत एनआयसीयू विभागात नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार, जन्मजात आजारांचे निदान व उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब व डायलिसिस मशीन द्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली. या शिबिरात ११५ बालकांची मोफत तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. सतीश (बाबुशेठ) लोढा यांनी आभार मानले.





स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित 'देशभक्तीचा जल्लोष' या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील. समवेत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, गीता कोतवाल आदी. शेजारील छायाचित्रात दिव्यांग कलाकार आपली कला सादर करताना दिसत आहेत.

# दिव्यांगांच्या सन्मानासाठी समाजाने पुढाकार घ्यावा

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आवाहन

नगर – सुदृढ व्यक्तींप्रमाणेच दिव्यांग बांधवांनाही सुंदर, सन्मानपूर्ण व आनंदी आयुष्य लाभले पाहिजे. यासाठी समाजाने संवेदनशीलतेने पुढाकार घेऊन अमूल्य योगदान दिल्यास त्यांच्या जीवनमानात निश्चितच सकारात्मक बदल घडेल, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित 'देशभक्तीचा जल्लोष' या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्गे, द्विशा फाऊंडेशनच्या अध्यक्षा गीता कोतवाल व दिव्यांग कलाकार उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, दिव्यांग कलाकारांनी सादर केलेला देशभक्तीचा जल्लोष हा अविस्मरणीय अनुभव आहे. पोलीस विभागाने त्यांना दिलेले व्यासपीठ कौतुकास्पद आहे. दिव्यांग बांधवांची जिद्द, परिश्रम व संघर्ष हे समाजासाठी प्रेरणादायी आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी करताना, दिव्यांग कलाकारांच्या देशभक्तीपर सांगीतिक कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

दिव्यांग कलाकारांनी सादर केलेल्या एकाहून एक नेत्रदीपक देशभक्तीपर गीतांनी पालकमंत्री व प्रेक्षक भारावून गेले. संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीबाबत आमचे आशिलांनी मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठस्तर अहमदनगर यांच्या कोर्टात रेमु. नंबर १९०/२०२५ चा दावा जाहीर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे सदर दाव्यामध्ये मे. कोर्टाने नि ५ व नि २८ वर आहे. ती परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारीत केलेला आहे. त्यामुळे सदरील मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचे हस्तांतराचे व्यवहार करु नयेत अगर मिळकतींवर कोणत्याही प्रकारचा बोजा निर्माण करु नये तसेच आमचे आशिलाचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये याउपर काही बोजे व इतर कोणत्याही प्रकारचे हस्तांतर निर्माण केल्यास ते आमचे आशिलावर व मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत. केवळ कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदरची नोटीस प्रसिध्द केली असे. दि.१६/०८/२०२५

**परिशिष्ठ**

**मिळकतीचे वर्णन :–**

जिल्हा अहिल्यानगर सब जिल्हा तालुका अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगर पालिका हद्दीतील घरजागा मिळकत

| सि स नंबर | क्षेत्र चौ मि. | चतु:सिमा पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ११८३ | १४१.१० | रस्ता | रस्ता | सि.स.नं. ११८४,११८२ | रस्ता |

येणे प्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत यावरील बांधकाम नळ कनेक्शन, विज कनेक्शन व इतर वाग वहिवाटीचे हक्कासह खाली काहीएक राखुन न ठेवीता.

**आमचे आशिल**
अभय जवरीलाल मुथ्था व इतर
रा.आदिनाथ रेसिडेन्सी समता कॉलनी, विनायकनगर,अ.नगर

ॲडव्होकेट
**श्री.राजेंद्र पनालाल शेलोत**
पंचमी टॉवर्स,दिल्लीगेट,
अहिल्यानगर

# ५१ कर्तृत्वशाली महिलांचा सन्मान करून भिंगार हायस्कूलने साजरा केला श्रावणी शुक्रवारनिमित्त सरस्वतीपूजन कार्यक्रम

नगर – भिंगार येथील भिंगार हायस्कूलमध्ये श्रावणी शुक्रवारनिमित्त सरस्वती पूजन करण्यात आले, तसेच या निमित्त विद्यालयात कर्तृत्वशाली ५१ महिलांचा सन्मान सोहळा झाला. भिंगार परिसरात स्वकष्टाने संसार चालवून आपल्या मुलांना उच्चपदस्थ अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, शास्त्रज्ञ यांसह विविध क्षेत्रांत शिक्षण देऊन मोठे केलेल्या मातांचा, तसेच स्वबळावर शिकून आशा सेविका, रुग्णसेविका, समाजसेविका शिक्षिका, पोलीस यांसारख्या क्षेत्रांत नावलौकिक मिळविणाऱ्या भिंगारमधील ५१ महिलांचा सन्मान केला.



भिंगार हायस्कूलमध्ये श्रावणी शुक्रवारनिमित्त सरस्वती पूजन करण्यात आले, तसेच या निमित्त विद्यालयात कर्तृत्वशाली ५१ महिलांचा सन्मान सोहळा झाला.

सरस्वती पूजनाची पारंपारिक प्रथा सांभाळून महिला सन्मानाची नवी परंपरा श्रीफळ, गुलाबपुष्पऐवजी प्रेरणादायी पुस्तके देऊन सुरु केली. कार्यक्रमाच्या सुत्रसंचलनापासून आभारापर्यंत सर्व जबाबदारी विद्यालयातील विद्यार्थिनींनी सांभाळली. यावेळी शाळा समितीचे सदस्य रवींद्र बाकलीवाल, अनिता बाकलीवाल, डॉ. गजेंद्र गिरी, समाजकल्याण अधिकारी प्रतिक शेळके उपस्थित होते. या आगळ्या–वेगळ्या उपक्रमाचे संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छाया फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वंदना आरण्ये यांनी स्त्री शक्तीबद्दल गौरवोद्गार काढले, उपमुख्याध्यापक चंद्रकांत वारुळे, कार्यक्रम संकल्पक व पर्यवेक्षिका मनिषा गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थिनींच्या लोकगीतांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम व रांगोळी प्रदर्शनाचे उपस्थितांनी कौतुक केले. याप्रसंगी दहावी व बारावीत प्रथम आलेल्या विद्यार्थिनींचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी डॉ. शुभांगी गिरी यांच्या प्रकट मुलाखतीद्वारे विद्यार्थीनींनी अडचणींना न घाबरता कसे सामोरे जावे, शिक्षण पूर्ण करून स्वत:च्या पायावर उभे राहण्यापर्यंत सहज व सोप्या शब्दात मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, परंपरेला आधुनिकतेची जोड देऊन विद्यार्थिनींसमोर भारतीय संस्कृतीचा जिवंत आदर्श ठेवणाऱ्या भिंगार हायस्कूलसारख्या विद्या मंदिरांची आज समाजात खरी गरज आहे. अभ्यासक्रम व पुस्तकांपलिकडे जाऊन सहज सुंदर जीवनमुल्यांची जाणीव विद्यार्थिनींमध्ये निर्माण होऊन आदर्श नागरिकत्वाची मूल्ये या कार्यक्रमातून जोपासली गेली, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी निमंत्रक शलाका रसाळ व अध्यापक, अध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी माता–पालक, विद्यार्थीनी उपस्थित होत्या. एनसीसीच्या विद्यार्थिंनीनी सादर केलेला ट्रुप कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१६/०८/२०२५.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे** शहर अहिल्यानगर येथील **पारगल्ली** भागातील जागेसह बांधकाम असलेली खालील वर्णनाची मिळकत–

**सिटी सर्व्हे नंबर ४४४१ ब चे जागा क्षेत्र २६.८० चौ.मीटर ही संपुर्ण जागा व यावरील संपुर्ण बांधकाम मिळकत.**

**यांसी चतु:सिमा**
पुर्वेस :– सि.स.नं.४४४१ अ — दक्षिणेस :– रस्ता
पश्चिमेस :– सि.स.नं.४४४२ — उत्तरेस :– सि.स.नं.४४३७

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक**
**१. सुभाष किसनदास पितळे,**
**२. नंदा सुभाष पितळे**
रा. माळीवाडा, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

# स्वातंत्र्यदिनी आदर्श विद्यालयात गुणवंतांचा सन्मान; सद्गुरु श्री साहेबराव आवारे प्रतिष्ठानचा उपक्रम

नगर – भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आदर्श महाविद्यालय जेऊर बाईजाबाई येथे सद्गुरु श्री साहेबराव आवारे प्रतिष्ठान तर्फे शालेय साहित्य वितरण व विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मन करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सैनिक नवनाथ मगर होते. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य जगन्नाथ जगदाळे, सद्गुरु श्री साहेबराव आवारे प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष अश्विनी मगर, माजी सैनिक ज्ञानदेव घोरपडे व पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



आदर्श महाविद्यालय जेऊर बाईजाबाई येथे सद्गुरु श्री साहेबराव आवारे प्रतिष्ठानतर्फे शालेय साहित्य वितरण व विशेष गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी अध्यक्षीय भाषणात मगर म्हणाले कि, शैक्षणिक प्रगती सोबतच चरित्र, प्रामाणिकपणा आणि समाजासाठी योगदान देण्याची भावना जपली पाहिजे. देशाभिमान जागृत ठेवला पाहिजे, साध्य मोबाईलच्या जमान्यात वाचन संस्कृती जपणे महत्वाचे आहे असे ते म्हणाले.

सन्मानित विद्यार्थ्यांनी यावेळी आपले अनुभव व्यक्त करत या प्रेरणादायी उपक्रमाबद्दल संस्थेचे आभार मानले.

सद्गुरु श्री साहेबराव आवारे प्रतिष्ठान दरवर्षी विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत असून सामाजिक शिक्षण वृत्तीला चालना देण्याचे कार्य करत आहे. कार्यक्रमाचे प्रस्तावीक आवारे सर यांनी केले. जगन्नाथ जगदाळे यांनी आभार मानले.

### ब्रह्माकुमारीजच्या सर्वात मोठ्या श्रीमद भगवद्गीता आर्ट गॅलरीची इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

नगर – हुबळी येथे ब्रह्माकुमारीज द्वारा निर्मित जगातील सर्वात मोठ्या श्रीमद भगवद्गीता आर्ट गॅलरीची इंडिया स्टार वर्ल्ड रेकार्डमध्ये नोंद करण्यात आली आहे. ही मेगा आर्ट गॅलरी कम योग प्रशिक्षण केंद्र, साडे पाच एकरमध्ये वसले असून श्रीमद भगवद्गीतावर आधारीत अध्यात्मिक ज्ञान व योग यांच्या आधारावर उभारलेले आहे. ही आर्ट गॅलरी ज्ञानलोक, ध्यानलोक, दिव्यलोक आणि देवलोक अशा चार भागांमध्ये विभागलेली आहे. येथे भारतीय आध्यात्मिक परंपरेचा इतिहास दर्शविला आहे. या आर्ट गॅलरीत एकूण ११४ ज्ञान पॅव्हिलियन्स आहेत. या आध्यात्मिक स्टॉल्समध्ये चलतचित्र मॉडेल्स, ट्रान्सलाईट्स, एम्बॉसिंग आर्ट्स, कटआउट्स, चित्रकला, इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान, प्रकाश व ध्वनी व्यवस्था इत्यादी आहेत.



बी के डॉ. बसवराज राजऋषि यांच्या समवेत दीपक हरके.

बी के डॉ. बसवराज राजऋषि यांनी सांगितले की, या आर्ट गॅलरीचा उद्देश जगातील जात, पंथ, रंग, धर्म यातील भेदभाव व अंधश्रद्धा दूर करणे आहे. हे एकच विश्व–ईश्वर, एकच विश्व–कुटुंब याचा संदेश जगातील नागरिकांना देते. या आर्ट गॅलरीतील ज्ञान हे व्यक्ती आणि समाजातील सर्व समस्या सोडवेल. ही आध्यात्मिक आर्ट गॅलरी जगातील सर्वात मोठी आहे. ही आर्ट गॅलरी प्राचीन भारतीय संस्कृती, वारसा आणि सभ्यता 'विश्वगुरू' म्हणून सिद्ध करेल.

ए.एन.आर./ए.एन.आर./आर.एस.आर.सी./सी.आर./३२०६ — स्थापना दि. ०३/११/२०००

## अहमदनगर मिरची मर्चंट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहमदनगर ता. जि. अहमदनगर

महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, अहमदनगर ४१४००१ फोन : २४१३५८७७३३

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांकरिता)

अहमदनगर मिरची मर्चंट नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर या संस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१२/०९/२०२५ रोजी सायं ६.०० वाजता, मयुर थाळी – हॉटेल इव्हॉल्व प्रिमीयर (साई इन) नगर –पुणे रोड, ओम गार्डन समोर, अहिल्यानगर.या ठिकाणी संस्थेचे चेअरमन मा.श्री.गोविंदजी मनियार यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.त्याकरिता सभेस सर्व सभासदांनी हजर रहावे, ही विनंती.

**वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय**

१. दि. १९/०९/२०२४ रोजी झालेल्या मागिल वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सहकारी वर्षाच्या अहवाल,ताळेबंद व नफा–तोटा पत्रक मंजूर करणे.
३. सन २०२४– २०२५ चे वैधानिक लेखा परिक्षण अहवालास मंजुरी देणे.
४. सन २०२४ – २०२५ चे दोषदुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
५. सन २०२४–२०२५ चे मंजुर अंदाजपत्रकापेक्षा कमी/जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
६. सन २०२५– २०२६ सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७. मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४ – २०२५ सालची नफा वाटणीस मंजूरी देणे.
८. सन २०२५–२०२६ साला करिता वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.
९. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेत गैरहजर असलेल्या सभासदांच्या रजेला मान्यता देणे.
१०. मा.अध्यक्ष यांचे पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा.

स्थळ: अहमदनगर
दि: १६/०८/२०२५

विनित
**श्री.दिपक एकनाथ दरेकर**
व्यवस्थापक (मा.संचालक मंडळाच्या वतीने)

सूचना : १) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून सभेचा कोरम पूर्ण झाला असे समजून सभेचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. २) कोणत्याही सभासदांस सभेपुढे असलेल्या विषयांसंदर्भात काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि.०४/०९/२०२५ चे आत संस्थेच्या कार्यालयात (सुट्टीचे दिवस) सोडून कामकाजाचे वेळेत लेखी स्वरुपात अर्ज आणून घावेत.लेखी अर्जाची पोहोच घेतल्याखेरीज कोणाचीही तक्रार ग्राह्य मानली जाणार नाही.त्यानंतर संचालक मंडळावर जबाबदारी राहणार नाही. ३) संस्थेचे हिशोबी पत्रके ज्यांना पाहिजे असतील त्यांनी संस्थेत (सुट्टीचे दिवस) सोडून कामकाजाचे वेळेत येऊन घेऊन जावेत. ४) संस्थेचे हिशोबी पत्रके हे नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील. ५) संस्थेच्या सभासदांसाठी प्रशिक्षण आयोजित केलेले असून सभा संपल्यानंतर लगेच प्रशिक्षणास सुरुवात केली जाईल.

रजि.नं.ए.एन,आर./आर.एस.आर/सी.आर. ३३४–९२–९३/१९९२

## डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था,मर्या., अहमदनगर

जा.नं.–वार्षिक सभा — दिनांक : ०५/०८/२०२५

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासदांकरीता)

डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची ३३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक– २३/०८/२०२५ रोजी, दुपारी ३.०० वा. सीताबन मंगल कार्यालय, सुखसागर हॉटेलमागे, कोठी रोड, अहिल्यानगर येथे मा. चेअरमन फा. विश्वास परेरा यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय**

१) अध्यक्षांची निवड करणे.
२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे व कायम करणे.
३) सन २०२४–२५ या कालावधीतील आर्थिक पत्रके,तेरीज, ताळेबंद व नफा–तोटा पत्रकास मान्यता देणे.
४) सन २०२४–२५ या कालावधीतील वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल यांस मान्यता देणे व सन २०२४–२५ चा दोष दुरुस्ती अहवाल सादर करणे.
५) नफा वाटणीस मंजुरी देणे व सभासदांना लाभांश जाहीर करणे. (पान क्र. १८ वर पहावी)
६) संचालक मंडळ व नातेवाईक कलम ७५(२) थकबाकी जाहीर करणे.
७) थकबाकी वसूलीसाठी निर्णय घेणे.
८) बाहेरील कर्ज उभारण्याचे अधिकार संचालक मंडळ यांना देणे.
९) सन २०२५–२६ या कालावधीचे अंतर्गत व शासकीय लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे.
१०) सन २०२५–२६ या कालावधीसाठी खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
११) संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस मंजूरी देणे.
१२) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय.

**मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**कार्यकारी अधिकारी**
**डॉन बॉस्को नागरी सहकारी**
**पतसंस्था मर्या.,अहिल्यानगर**


टीप : १) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर विषय पत्रिकेतील विषयांचा निर्णय घेण्यासाठी सभा घेतली जाईल. २) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपूर्वी तीन दिवस आधी लेखी आलेल्या प्रश्नांवरच चर्चा करण्यात येईल. मात्र असे विषय उपविधी सुधारणा व सभासदत्त्व रद्द करणे या व्यतिरिक्त असावेत. तसेच एखाद्या विषयाचा सहा महिन्याच्या आत पुनर्विचार करण्यासंबंधीचा विषय नसावा.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

### संत निरंकारी मिशनचे वननेस वनप्रकल्पांतर्गत

# १७ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण अभियान

नगर – संत निरंकारी मिशन हरित जाणीवेला आणि पर्यावरणाप्रती अतूट समर्पणाला निरंतर वृद्धिंगत करत १७ ऑगस्ट ला 'वननेस वन' उपक्रमाच्या पाचव्या टप्प्यांतर्गत देशभरातील अनेक नवीन ठिकाणे या जनसामुदायिक अभियानाशी जोडेल. सकाळी हजारो सेवादार आणि श्रद्धाळू भाविक एकत्रितपणे वृक्षारोपणाच्या माध्यमातून निसर्गाप्रति आपली निष्ठा व त्याच्या संरक्षणाचा संकल्प याचा पुनरुच्चार करतील.



वननेस वन उपक्रमांतर्गत मंडळाच्या नगर शाखेच्या वतीने भिंगार येथील नवीन मराठी शाळा, रयत शिक्षण संस्था च्या प्रांगणात व तपोवन रोड येथील नियोजित निरंकारी सत्संग भवन परिसरात सकाळी ७ ते ९ या वेळेत वृक्षारोपण करण्यात येईल.

सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनाखाली २०२१ मध्ये सुरू झालेल्या 'वननेस वन' अभियानाअंतर्गत आतापर्यंत देशभरातील ६०० हून अधिक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. ही केवळ हिरवळ वाढवण्याची मोहिम नसून, लघु वनांच्या रूपात एक शाश्वत आणि संतुलित पर्यावरण निर्माण करण्याच्या दिशेने एक यथायोग्य प्रयत्न आहे. मिशनचे स्वयंसेवक या वृक्षरोपांची देखभाल अत्यंत श्रद्धा व समर्पणाने करत आहेत, कारण त्यांच्यासाठी प्रत्येक रोपटे हे केवळ एक वृक्ष नसून भावी पिढ्यांच्या श्वासांचा आधार आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक **हर्षल संतोष भंडारी रा.टाकळी ढोकेश्वर,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीची असून विद्यमान मालकांनी आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णन :** – डि.।। अहिल्यानगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **केडगांव** येथील स. नं. **४९७** मधील जमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सीमा पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|---|
| ५४ | २०२.३५ | प्लॉट नं.५५ | ओपन स्पेस | प्लॉट नं.५३ | स.नं.५०१ पैकी रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.

दि.१६/०८/२०२५
अहिल्यानगर

ॲडव्होकेट
**श्री.संदीप नामदेव भोगाडे**
पत्ता : स्टेट बँक चौक, अहमदनगर–४१४००१
मो : 9420335535, 8208730700




# तीस टक्के महिला अशक्तपणाच्या बळी

**आरोग्य वार्ता**

**डॉ. कुंदन गायकवाड**



लोहाची कमतरता ही एक मोठी समस्या बनत आहे. तीस टक्के महिला अशक्तपणाच्या बळी आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, प्रत्येक तिसरी महिला लोहाच्या कमतरतेची बळी आहे.

महिलांमध्ये लोहाची कमतरता ही एक सामान्य; परंतु अनेकदा दुर्लक्षित आरोग्य समस्या बनली आहे. विशेषतः पुनरुत्पादक वयाच्या महिलांमध्ये ही कमतरता गंभीर अशक्तपणासारखी स्थिती निर्माण करते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतातील सुमारे ३० टक्के महिला आणि ३७ टक्के गर्भवती महिला अशक्तपणाने ग्रस्त आहेत. लोहाच्या कमतरतेच्या सुरुवातीच्या टप्प्यात, लक्षणे इतकी सौम्य असतात, की महिला अनेकदा त्याकडे दुर्लक्ष करतात किंवा डॉक्टर त्यांना काही सामान्य थकवा किंवा निर्जलीकरणाशी जोडतात. अशा परिस्थितीत, काही तज्ज्ञांचा असा विश्वास आहे, की फक्त रक्तातील लोहाचे प्रमाण तपासणे पुरेसे नाही. त्याच वेळी, काही डॉक्टर फक्त सीरम किंवा लोह रक्त संख्या पाहतात; परंतु शरीरात लोह साठवणाऱ्या फेरिटिनची तपासणी करणे खूप महत्वाचे आहे. कधीकधी सीरममध्ये लोह सामान्य असते; परंतु फेरिटिन खूप कमी असते. त्यामुळे थकवा, चक्कर येणे आणि हातपाय थंड होणे अशी लक्षणे दिसतात.

**लोहाच्या कमतरतेचा शरीरावर परिणाम**

शरीराला निरोगी लाल रक्तपेशी बनवण्यासाठी लोहाची आवश्यकता असते. या पेशी हिमोग्लोबीनने समृद्ध असतात. त्या शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन पोहोचवण्याचे काम करतात. जेव्हा लोहाची कमतरता असते, तेव्हा हिमोग्लोबीनचे उत्पादन कमी होते. त्यामुळे शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा प्रभावित होतो आणि व्यक्ती अशक्तपणाला बळी पडते.

**लोहाची कमतरता दर्शविणारी चिन्हे**

* **सतत थकवा आणि ऊर्जेचा अभाव:** जर एखाद्या महिलेला पुरेशी झोप झाली असली, तरीही तिला नेहमी थकवा जाणवत असेल तर ते हलक्यात घेऊ नये. हे लोहाच्या कमतरतेचे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते. म्हणूनच, हे बहुतेकदा तणाव, झोपेची कमतरता किंवा कामाच्या ओझ्याशी संबंधित असते; परंतु शरीराकडून हा एक इशारादेखील असू शकतो.

* **चक्कर येणे:** लोहाच्या कमतरतेमुळे शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी झाल्यावर ऑक्सिजन पेशींपर्यंत योग्यरित्या पोहोचू शकत नाही. यामुळे, उभे राहताच चक्कर येणे किंवा चालताना थोडीशी चक्कर येणे सामान्य होते. बऱ्याचदा लोक ते डिहायड्रेशन समजून दुर्लक्ष करतात, तर ते निमियाचे लक्षण असू शकते.

* **पायांना थंडी वाजणे:** जर तुमचे हात आणि पाय उष्ण हवामानातही थंड राहिले, तर ते शरीरात लोहाची कमतरता असल्याचे लक्षण असू शकते. लोहाची कमतरता रक्ताभिसरण आणि शरीराचे तापमान नियंत्रणावर परिणाम करते. रक्ताभिसरणाचा विषय समजून अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते; परंतु प्रत्यक्षात ते अंतर्गत कम कुवतपणाचे लक्षण आहे.


**चाचणी कधी करावी?**

वर उल्लेख केलेल्या लक्षणांपैकी कोणतीही लक्षणे जाणवत असतील, तर केवळ लोहाची पातळीच नाही, तर फेरिटिनची चाचणी करा. हे शरीरात लोह साठवणुकीचे सूचक आहे. डॉक्टर अनेकदा या चाचणीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे योग्य निदान शक्य होत नाही. दुसरीकडे, लोहाची कमतरता हलक्यात घेणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः ज्या महिला आधीच हार्मोनल बदल आणि मासिक पाळीसारख्या परिस्थितीतून जात आहेत, त्यांच्यासाठी हा धोका जादा आहे.

# हिपॅटायटीस ठरू शकतो जीवघेणा

**व्याधी विचार**

**डॉ. दिलीप शिरसाट**



हिपॅटायटीस हा एक आजार आहे. त्यात यकृताला सूज येते आणि कधीकधी तो प्राणघातक ठरू शकतो. ही सूज सहसा विषाणूमुळे होते; परंतु अल्कोहोल, खाण्याच्या चुकीच्या सवयी, काही औषधे हीदेखील त्यामागील कारणे असू शकतात.

लोक या आजाराबद्दल अनेकदा गोंधळलेले असतात. हिपॅटायटीस म्हणजे यकृतात सूज येणे. ही सूज विषाणूमुळे होते आणि वेळेवर उपचार न केल्यास यकृत निकामी होणे, यकृताचा कर्करोग यासारखे गंभीर आजार होऊ शकतात. हिपॅटायटीसचे ५ मुख्य प्रकार आहेत ज्यात ए, बी, सी, डी आणि ई यांचा समावेश आहे; परंतु यापैकी हिपॅटायटीस बी आणि सी सर्वात धोकादायक मानले जातात. कारण ते शरीरात बराच काळ राहतात आणि हळूहळू यकृताचे नुकसान करू शकतात.

हिपॅटायटीस कोणालाही होऊ शकतो; परंतु काही कारणांमुळे ते वेगाने पसरते. घाण अन्न, संक्रमित रक्त किंवा सुयांचा वापर, संक्रमित आईपासून बाळापर्यंत किंवा माती यामुळे तो पसरतो.

**हिपॅटायटीसची लक्षणे**

हिपॅटायटीसची लक्षणे सुरुवातीला अगदी सामान्य असू शकतात; परंतु जेव्हा तो गंभीर होतो, तेव्हा थकवा आणि अशक्तपणा, भूक न लागणे, पोटदुखी किंवा सूज, उलट्या किंवा अतिसार, गडद रंगाचा मूत्र, कावीळ आणि ताप अशी लक्षणे दिसतात. कधीकधी हा आजार कोणत्याही लक्षणांशिवायदेखील होऊ शकतो आणि हळूहळू यकृताचे नुकसान करत राहतो. म्हणून, वेळोवेळी तपासणी करणे महत्वाचे आहे.

# बिस्कीट खाताय, सावधान!

**डाएट स्टोरी**

**डॉ. प्रसन्न नेने**



चहाचा कप असो किंवा ऑफिसमध्ये भूक भागवण्याचा सोपा पर्याय; बिस्किटे जवळजवळ प्रत्येक घराच्या स्वयंपाकघराचा भाग बनली आहेत. मुले असोत किंवा प्रौढ; सर्वांनाच कुरकुरीत आणि गोड बिस्किटे आवडतात; परंतु इतक्या आवडीने खाल्लेले बिस्किट हळूहळू आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.

बिस्किटे हा सहसा हलका आणि सोयीस्कर नाश्ता मानला जातो; परंतु तज्ज्ञांच्या मते, ते तुमच्या आरोग्यासाठी 'गोड विष' ठरू शकतात. बिस्किटांमध्ये वापरले जाणारे रिफाइंड पीठ, रिफाइंड साखर आणि हायड्रोजनेटेड तेल शरीराचे चयापचय बिघडवू शकतात. बिस्किटांमध्ये रिफाइंड पीठ आणि कमी फायबर असलेल्या पदार्थांमुळे ते सहज पचत नाही. त्याचे सतत सेवन केल्याने बद्धकोष्ठता, गॅस आणि आम्लता सारख्या समस्या वाढू शकतात.

**वजन वाढण्याचा धोका**

बिस्किटांमध्ये लपलेल्या कॅलरीज आणि साखर शरीरात चरबी म्हणून जमा होऊ लागतात. वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी बिस्किटे खाणे अजिबात योग्य नाही.


**रक्तातील साखरेवर परिणाम**

मधुमेहाच्या रुग्णांनी बिस्किटांपासून दूर राहावे. त्यांचा 'ग्लायसेमिक इंडेक्स' जास्त असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढू शकते. बिस्किटांमध्ये असलेले 'ट्रान्स फॅट' आणि प्रिझर्व्हेटिव्ह्ज शरीरात हार्मोनल असंतुलन निर्माण करू शकतात. महिलांमध्ये बिस्किटांळे मुरुमे, अनियमित मासिक पाळी आणि थकवा येऊ शकतो.

# पहाटे झोपेतून जाग येणे हे गंभीर आजाराचे लक्षण

**घ्या काळजी**

**डॉ. अजिंक्य बोन्हाडे**



रात्री ३ ते ५ वाजण्याच्या दरम्यान झोपेतून जाग येणे ही गोष्ट आता अनेकांसाठी सामान्य बनली आहे. बऱ्याच वेळा आपण याकडे झोपमोड, थोडासा तणाव, चुळबुळ किंवा चहा-कॉफीची सवय म्हणून पाहतो; मात्र तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, अशा वेळेला सतत जाग येणे केवळ शारीरिक थकवा नाही, तर हे तुमच्या मनातील खोल अस्वस्थतेचे किंवा शरीरातील बिघडल्याचे लक्षण असू शकते.

शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर पहाटे तीन ते पाच वाजण्याच्या वेळेला वुल्फ अवर म्हटले जाते. ही अशी वेळ असते, जेव्हा मेंदू जास्त भावनिक, हार्मोनल आणि मानसिक परिस्थितीत असतो. याच काळात आपल्या मनातले दबलेले विचार, चिंता किंवा काही अज्ञात भावना बाहेर यायला सुरुवात होतात. रोजच पहाटे तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान जागे होत असाल आणि पुन्हा झोप येत नसेल तर याकडे दुर्लक्ष करू नका. आपल्या झोपेची अनेक चक्र असतात, जसे की हलकी झोप, दीर्घ झोप नंतर 'रेम' (रॅपीड आय मूव्हमेंट)) झोप. या झोपेते स्वप्न पडतात. या चक्रात एखाद-दुसऱ्यावेळी जागे होणे सामान्य असते; मात्र सतत जागे होणे आरोग्य समस्येचे संकेत असू शकतात.

**तणाव आणि चिंता**

सततचा मानसिक ताण शरीराला अलर्ट स्थितीत ठेवतो. अशावेळी झोपेत असूनही मेंदू शांत होत नाही. दिवसभर मनात राहिलेल्या नकारात्मक विचारांचा भार किंवा काही गोष्टी ज्या आपण दडपून ठेवतो त्या रात्री या वेळेस जागे करत असतात.

**जैविक घड्याळाचा बिघाड**

आपल्या शरीरातील नैसर्गिक घड्याळ म्हणजे , हे आपल्याला झोपायला आणि जागे व्हायला मदत करते; पण जर आपली झोपेची वेळ, वेळेवर जेवण नसेल, तर हे घड्याळ बिघडू शकते. त्यामुळे पहाटे लवकर जाग येणे ही त्याचीच एक प्रतिक्रिया असते.

**हार्मोन्स आणि शरीरातील घडामोडी**

रात्री तीन नंतर शरीरात 'कॉर्टिसॉल' नावाचे स्ट्रेस हार्मोन नैसर्गिकरीत्या वाढायला लागतं.

# प्रभावी मध आणि दालचिनी

**आयुर्वेद आणि विकार**



मध आणि दालचिनी हे घटक जवळपास प्रत्येक घरात आढळतात. या दोहोंमध्ये औषधी गुणधर्म आहेत. आयुर्वेदानुसार या दोन्ही घटकांच्या एकत्रिकरणाने अधिक परिणाम साधला जातो.

पोटदुखीपासून रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत अनेक विकारांवर, व्याधींवर प्रभावी औषध म्हणून दालचिनी आणि मधाच्या मिश्रणाचा वापर करता येईल.

* मुरुमांची समस्या दूर करण्यासाठी मध आणि दालचिनीचा लेप तयार करून चेहऱ्याला लावता येईल. तीन चमचे मधात एक चमचा दालचिनीची पूड घालून हा लेप तयार करता येईल. हा लेप रात्री झोपण्याआधी मुरुमांवर लावा. सकाळी धुवून टाका. त्वचेशी संबंधित अनेक समस्यांवर हा रामबाण उपाय ठरू शकतो.


* मध आणि दालचिनीच्या सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढून विविध विकारांना आळा बसू शकतो. या दोन्ही घटकांमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स आणि बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. पचनशक्ती सुधारण्यासाठीही या मिश्रणाचा वापर करता येईल. यामुळे पोटाशी संबंधित समस्या दूर होऊ शकतील.

* आर्थ्रायटिसच्या वेदनांवर मात करण्यासाठी दालचिनी आणि मधाचं एकत्रित सेवन करता येईल. कोमट पाण्यात मध आणि दालचिनीची पूड घालून लेप तयार करा. हा लेप प्रभावित भागावर लावा. आराम मिळेल.

# लहानपणातच वाढतो लठ्ठपणाचा धोका

**आरोग्यवेध**

**डॉ. अजेय गर्जे**



मुलांमध्ये लठ्ठपणा वाढेल की नाही हे जाणून घेणे आता कठीण राहिलेले नाही. अलिकडच्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे, की सहा वर्षांच्या वयात आता संबंधित मुलांत लठ्ठपणा वाढेल, की नाही हे शोधता येते.

डच शास्त्रज्ञांच्या मते, पहिली पाच वर्षे मुलाच्या निरोगी आयुष्यासाठी सर्वात महत्त्वाची असतात. ३,५०० हून अधिक मुलांच्या नोंदी तपासल्यानंतर असे आढळून आले, की जर ६ वर्षांच्या वयात बॉडी मास इंडेक्स एका युनिटने वाढला तर १८ वर्षांच्या वयापर्यंत लठ्ठपणा किंवा जास्त वजनाचा धोका दुप्पट होतो.

**लठ्ठपणा किती धोकादायक आहे?**

लठ्ठपणा हा एक मूक हत्यारा आहे. तो रक्तदाब आणि कर्करोगासारख्या अनेक गंभीर आजारांना जन्म देतो. अनेक अभ्यासातून असे आढळून आले आहे, की मुलांमध्ये लठ्ठपणा वेगाने वाढत आहे. सुमारे अर्धी मुले वेळेपूर्वीच जास्त वजनाची बळी ठरतात. 'युरोपीयन कॉंग्रेस ऑन ओबेसिटी'मध्ये सादर केलेल्या एका वेगळ्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की गेल्या १५ वर्षांत किशोरवयीन मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढले आहे. 'अल्ट्रा-प्रोसेस्ड' अन्न आणि खराब जीवनशैली हे मुलांमध्ये लठ्ठपणासाठी सर्वात मोठे जबाबदार घटक आहेत. अशा परिस्थितीत, बालपणातच हे जाणून घेणे महत्वाचे आहे की लठ्ठपणा तरुणपणात होईल की नाही.

**बालपणात लठ्ठपणाचा अंदाज लावण्याचे तंत्र**


अलीकडेच शास्त्रज्ञांनी एक अनुवांशिक चाचणी (पॉलिजेनिक रिस्क स्कोअर) विकसित केली आहे, जी पाच-सहा वर्षांच्या वयापर्यंत सांगू शकते, की प्रौढत्वात मुलाला लठ्ठ होण्याचा किती धोका आहे. ही चाचणी डीएनएमधून मिळवलेल्या अनुवांशिक डेटाचे विश्लेषण करते आणि लठ्ठपणाचा धोका वाढवणारे हजारो अनुवांशिक प्रकार ओळखते. जर पालक लठ्ठ असतील, तर मुलांमध्ये लठ्ठपणाचा धोका जास्त असतो. नवीन अनुवांशिक चाचण्या ही अनुवांशिक प्रवृत्ती समजून घेण्यास मदत करतात.

* **बॉडी मास इंडेक्स:** मुलांमध्ये 'बीएमआय' त्यांच्या वय आणि लिंगानुसार मोजला जातो. दोन वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या मुलांमध्ये, ९५ व्या पर्सेंटाइलपेक्षा जास्त 'बीएमआय' लठ्ठपणाचे लक्षण मानले जाते. तथापि, 'बीएमआय' केवळ सध्याच्या लठ्ठपणाचे संकेत देते. भविष्यातील लठ्ठपणाचे नाही.

* **मशीन लर्निंग:** एआय आणि मशीन लर्निंग मॉडेल्स बालपणातील लठ्ठपणाचा अंदाज लावण्यात अचूकता वाढवतात. हे मॉडेल्स जन्माच्या वेळी मुलाचा 'बीएमआय', गर्भावस्थेतील वय आणि विविध क्लिनिकल भेटींमधून मिळालेला 'बीएमआय' यासारख्या मूलभूत डेटाचा वापर करून पाच वर्षांच्या वयापर्यंत मुलाच्या लठ्ठपणाच्या श्रेणीचा अंदाज लावू शकतात.

# जेवल्यानंतर कोणत्या गोष्टी टाळाव्यात...

**कुठे चुकतो आपण?**



आपल्या शरीरावर आहाराचा परिणाम होत असतो. जेवल्यानंतर तीव्र स्वरुपाचा व्यायाम करू नये, रात्री हलका आहार घ्यावा हे आपण जाणतो. पण जेवणानंतर केलेल्या चुका आपल्याला महागात पडू शकतात. पुरेशा माहितीअभावी या चुका घडू शकतात. जेवल्यानंतर कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी...

* फळांमधून बरेच पोषक घटक मिळतात. पण जेवणानंतर फळं खाऊ नयेत. पोषक घटकांचा लाभ मिळवण्यासाठी फळं रिकाम्या पोटी किंवा जेवणानंतर दोन ते तीन तासांनी खायला हवीत. जेवणानंतर लगेच फळं खाल्ल्यामुळे अन्नपचनावर परिणाम होऊ शकतो.

* जेवल्यानंतर लगेच झोपू नये. रात्रीच्या जेवणानंतर साधारण दोन तासांनी झोपणं गरजेचं आहे. जेवणानंतर शरीर अन्न पचनाची क्रिया सुरू करतं. मात्र झोपल्यामुळे या क्रियेत अडथळे येतात. अन्नपचन झालं नाही तर गॅस, ॲसिडिटी, पोट बिघडणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

* धूम्रपान आणि तंबाखूचं सेवन शरीरासाठी किती हानिकारक आहे हे आपण जाणतो. अनेकजण जेवल्यानंतर धूम्रपान करतात. मात्र यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

* जेवल्यानंतर लगेच पाणी पिऊ नये. पाण्यामुळे ॲसिडिटीची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे जेवणानंतर साधारण अर्ध्या तासाने पाणी प्यायला हवं.

# प्रसूतीनंतरचं आहारतंत्र

**काय खावं?**



गर्भधारणेनंतर तसंच प्रसूतीनंतर महिलांना बऱ्याच शारीरिक आणि मानसिक बदलांना सामोरं जावं लागतं. या काळात शरीराची बरीच झीजही होते. त्यातही नोकरी-व्यवसाय करणाऱ्या महिलांना ही दुहेरी जबाबदारी सांभाळताना बरीच कसरत करावी लागते. म्हणूनच महिलांनी प्रसूतीनंतर पोषक आहार घ्यायला हवा. प्रसूतीनंतरच्या आहारतंत्राविषयी...

* आहारात ताजी फळं आणि भाज्यांचा समावेश असावा. तुमच्या जेवणाचं अर्ध ताट ताजी फळं आणि भाज्यांनी भरलेलं हवं. त्यातही हिरव्या पालेभाज्यांचा अधिक समावेश करायला हवा तर उर्वरित अर्ध्या भागात ओट्स, हातसडीच्या तांदळाचा भात, गव्हाचा ब्रेड, पोळ्या अशा पूर्ण धान्याचा समावेश असावा.

* शरीराची कॅल्शियमची गरज भागवण्यासाठी आहारात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करा. दूध, दही, पनीर असे पदार्थ खा.

* या काळात जंक फूड, प्रक्रिया केलेले, खारवलेले, तळलेले पदार्थ खाऊ नका. मधल्या वेळची भूक भागवण्यासाठी एखादं फळ, सुका मेवा, चणे, शेंगदाणे अशा आरोग्यदायी पदार्थांची निवड करा.

* प्रसूतीनंतर शरीराला लोह आणि फॉलिक ॲसिडची गरज असते. टोमॅटो, आवळा, मोड आलेली कडधधान्यं, सुका मेवा, अंजीर, मनुका, गूळ, बीट ,भेंडी, पालक, गाजर, चिकन अशा पदार्थांमधून या पोषक घटकांची गरज भागू शकते.

* कॉफी, कार्बनयुक्त पेयांचं प्रमाण कमी करा. मद्यपानही टाळा.

* गरोदरपणात वाढलेलं वजन कमी करण्यासाठी लगेच डाएट करू नका. या काळात झालेली झीज भरून काढण्यासाठी शरीराला पुरेसा वेळ द्या. शास्त्रीय पद्धतीने आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने वजन कमी करा.

**नवसंशोधन**

## शाकाहार ठरतो लाभदायी


शाकाहारामुळे मूत्रमार्गाच्या जंतूसंसर्गाचा धोका कमी होत असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे.



ई कोलाय सारख्या बॅक्टेरियामुळे मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग उद्भवतो. हा बॅक्टेरिया मूत्रमार्गात प्रवेश करून मूत्रपिंड तसंच ग्रंथींचं नुकसान करतो. तैवानमधल्या एका संस्थेत याबाबतचं संशोधन करण्यात आलं आहे. 'सायंटिफिक रिपोर्टस' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे.

**दंतारोग्य**

## दातांमध्ये फटी असतील तर...



तुमच्या दोन दातांच्या मध्ये मोठ्या फटी असतील तर अधिक काळजी घ्यायला हवी. या फटींमध्ये अडकलेले अन्नकण कुजून तोंडाला दुर्गंधी येऊ शकते. दात घासणं तसंच फ्लॉसिंग म्हणजे दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढण्यासोबतच इतरही उपायोजना करायला हव्यात. दातांच्या फटींमध्ये जाऊन अन्नकण स्वच्छ करणारी काही उपकरणं उपलब्ध आहेत. या उपकरणांचा वापर करून प्लाकच्या निर्मितीला आळा घालता येतो.

**जपणूक त्वचेची**

## टाळा त्वचेचं नुकसान



व्यायाम केल्यानंतर अनेकांच्या चेहऱ्यावर मुरुमं, पुटकुळ्या येतात. घाम, धूळ, घाणीमुळे असं होऊ शकतं. जीममध्ये व्यायाम करत असाल तर उपकरणं वापरण्याआधी ती नीट पुसून घ्या. व्यायाम करताना केस नीट बांधून घ्या. घामाचे हात वारंवार चेहऱ्याला लावू नका. व्यायामानंतर आंघोळ करा. घामेजलेले कपडे बदला. घामाच्या कपड्यांमध्ये फार काळ राहू नका. व्यायामाला जाताना ढगळ कपडे घाला. व्यायामादरम्यान चेहऱ्यावर कोणताही मेक अप नसावा.

**आजीबाईचा बटवा**

## केसांचं गळणं थांबवण्यासाठी...

केस गळण्याची समस्या खूपच त्रासदायक ठरू शकते. केस गळण्यावर वेळेत उपाय केले नाहीत तर टक्कलही पडू शकतं.



काही घरगुती उपायांनी केस गळण्यावर नियंत्रण मिळवता येतं. कांद्याचा रस लावल्यामुळे केस गळणं थांबू शकतं. कांदा किसून त्याचा रस काढा. हा रस टाळूला लावा. दोन तासांनी केस धुवून टाका. हा उपाय आठवड्यातून दोन ते तीन वेळा करा. यामुळे बराच लाभ होईल. ग्रीन टीमुळेही केस गळणं थांबू शकतं. थोडा ग्रीन टी पाण्यात उकळून घ्या. हे पाणी टाळूवर लावा. तासाभराने केस धुवून घ्या.



स्वातंत्र्यदिना निमित्त आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

# स्वातंत्र्यदिनाचा सोहळा आणि अवयवदान जनजागृती उपक्रम अहिल्यानगर महानगरपालिकेच्यावतीने एकत्रितरित्या साजरा

**स्वातंत्र्यदिना निमित्त आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण, अधिकारी-कर्मचाऱ्यांची अवयवदान शपथ**

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्यदिनाचा सोहळा आणि अवयवदान जनजागृती उपक्रम एकत्रितरित्या साजरा करण्यात आला. मुख्य प्रशासकीय इमारतीवर आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपयुक्त संतोष टेंगले, उपायुक्त सपना वसावा, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, अग्निशामक दल प्रमुख शंकर मिसाळ, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता श्रीकांत निंबाळकर, अभियंता वैभव जोशी, सुरेश इथापे, शेखर देशपांडे, शहाजान तडवी, अशोक साबळे, मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवी वातावरणात महापालिकेच्या वतीने अवयवदान जनजागृती व शपथग्रहण कार्यक्रम देखील पार पडला. महापालिकेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी अवयवदान ही सर्वोच्च मानवसेवा या संकल्पनेला धरून अवयवदानाची शपथ घेतली. कार्यक्रमात सुनिता थोरात यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांनी १६ वर्षांपूर्वी आपल्या पतीस अवयवदान करून एक आदर्श निर्माण केला होता. त्यांच्या या कार्याचा गौरव आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ आणि प्रशस्तिपत्र देऊन करण्यात आला.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण

नगर – भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस मुख्यालय कवायत मैदानावर जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा झाला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त डॉ. यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल आदी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक व शालेय विद्यार्थी उपस्थित होते.



स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस मुख्यालय कवायत मैदानावर जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा झाला. ।वेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त डॉ. यशवंत डांगे, उपवनसंरक्षक धर्मवीर साळविठ्ठल आदी. शेजारील छायाचित्रात पालकमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार व धनादेश वितरण तसेच उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

पालकमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार व धनादेश वितरण व उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सेना दलात कार्यरत असताना वीरमरण आलेले शहीद जवान रामचंद्र लहू साठे (लोणी हवेली, ता. पारनेर), रामदास साहेबराव बढे (मेंढवण, ता. संगमनेर) व संदीप पांडुरंग गायकर (मु. पो. ब्राम्हणवाडा, ता. अकोले) यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी १ लाख रुपयांचा मदतीचा धनादेश देण्यात आला.

जिल्ह्यात मे महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत जीवाची पर्वा न करता दोन महिलांना व इतर नागरिकांना जीवनदान देणारे सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते, पोलीस कॉन्स्टेबल नितीन गांगुर्डे व अन्सार शेख यांचा सन्मान झाला. शंभर दिवसांच्या विशेष कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या २३ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत जिल्ह्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला. जिल्हा शासकीय रुग्णालयातील १९ जिवंत अवयवदात्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या जिल्ह्यातील १८ विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. जिल्हा परिषद आरोग्य विभागास शासनाकडून प्राप्त पाच शववाहिकांचे लोकार्पणही करण्यात आले.

याप्रसंगी मंत्री विखे पाटील यांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ३ नाविन्यपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ

कार्यक्रमात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तीन डिजिटल उपक्रमांचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते झाला. या उपक्रमांचा उद्देश नागरिकांशी थेट व तातडीचा संवाद अधिक मजबूत करणे आणि योजना अंमलबजावणीत पारदर्शकता वाढवणे हा आहे. 'जिल्हाधिकारी कार्यालय – संवाद सेतू' या सेवेमार्फत विविध विभागांच्या सेवा, आवश्यक कागदपत्रांची यादी व नजीकच्या सेतू केंद्रांची माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने व्हॉट्सॲपवर मिळणार आहे.

### 'जिल्हाधिकारी कार्यालय व्हॉट्सॲप चॅनेल

'आपलं शिवार' या अधिकृत चॅनेलद्वारे प्रशासनाची अद्ययावत माहिती, आपत्तीविषयक सूचना तसेच राज्य शासनाच्या उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत थेट पोहोचवली जाईल. याशिवाय, विशेष न्याय विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या अनुदानांच्या प्रगतीस्थितीची माहिती लाभार्थ्यांना मोबाईलवर पाहण्याची सुविधा उपलब्ध होईल, ज्यामुळे वेळ व खर्च वाचेल तसेच पारदर्शकता वाढेल. या उपक्रमांमुळे प्रशासन-नागरिक संवाद अधिक सुलभ व परिणामकारक होण्यास मदत होईल.

# ७८ मिनिटात ७८ किमी जलतरण करुन विक्रमी कामगिरीने स्वातंत्र्यदिन साजरा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आ. कै. अनिलभैय्या राठोड सिद्धीबाग जलतरण तलावावर कुलकर्णीज स्विमिंग ॲण्ड रिसर्च अकॅडमीच्या वतीने ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त अनोखा उपक्रम राबवण्यात आला. यामध्ये ७ ते २४ वर्ष वयोगटातील जलतरणपटूंनी तब्बल ७८ किलोमीटर जलतरण केवळ ७८ मिनिटांमध्ये करून विक्रमी कामगिरी करत स्वातंत्र्य दिन अनोख्या पद्धतीने साजरा केला. या उपक्रमामागे ॲकॅडमीचे संचालक गणेश कुलकर्णी यांची संकल्पना असून, या कार्यक्रमाची यशस्वी आखणी आणि अंमलबजावणी संचालिका भूपाली कुलकर्णी आणि आंतरराष्ट्रीय किर्तीची जलतरणपटू व प्रथितयश प्रशिक्षिका मेघना कुलकर्णी यांनी केली.



७८ मिनिटात ७८ किमी जलतरण करुन विक्रमी कामगिरीने स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला.

दरवर्षी स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने या संस्थेच्या वतीने हा उपक्रम राबवला जातो. स्वातंत्र्य मिळून जितकी वर्षे पूर्ण होतात, तितक्या किलोमीटरचे जलतरण विद्यार्थी व विद्यार्थिनी एकत्रितरीत्या पार करतात. अहिल्यानगर शहरामध्ये सर्वात प्रथम लांब पल्ल्याची जलतरणपटू एकता कुलकर्णी हिने समुद्रामध्ये ३२ किलोमीटर एवढे मोठे अंतर पार करून हा उपक्रम करता येतो हे सिद्ध केले होते. या उपक्रमाद्वारे मुलांच्या मनात देशप्रेमाची भावना दृढ व्हावी व स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्म्यांप्रती आदर निर्माण व्हावा, हेच ॲकॅडमीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे गणेश कुलकर्णी यांनी सांगितले.

**जलतरणात चमकलेले जलतरणपटू यामध्ये मुलांमध्ये –** वाल्मिक कुलकर्णी – ५५०० मीटर, रणविजय घोरपडे – ५४०० मीटर, श्लोक देशपांडे – ५२०० मीटर, सोहम गुंड – ५००० मीटर, ओम फलके – ३४०० मीटर, अजिंक्य शेलार – २९०० मीटर, शौर्य जाधव – २००० मीटर, यशराज कर्डिले – २००० मीटर, शिवराज रोहकले – २००० मीटर, राघव लोटके – १५०० मीटर, ऋषी तांबे – १५०० मीटर, आरुष दातरंगे – १५०० मीटर, श्लोक केदार – १००० मीटर, आयुष नवले – १००० मीटर, अमित उजागरे – १००० मीटर, दर्श पाडळे – ५०० मीटर, समर्थ दातरंगे – १३०० मीटर

**मुलींमध्ये –** चैत्राली धर्माधिकारी – ४६०० मीटर, स्वरा तांबे – ४५०० मीटर, श्रेया रावस – ४५०० मीटर, सिद्धी देशपांडे – ४४०० मीटर, आरोही क्षीरसागर – ३९०० मीटर, त्रिवेणी पंडित – ३८०० मीटर, धनश्री फलके – ३२०० मीटर, श्रीजा राय – ३२०० मीटर, जान्हवी लोटके – १७०० मीटर, श्रिया जाधव – ११०० मीटर, स्वरा मोकाटे – ११०० मीटर, सई लोंढे – १००० मीटर

याचबरोबर प्रशिक्षिका मेघना कुलकर्णी हिने ४ किलोमीटरचे अंतर जलतरणपटूंबरोबर पोहून पूर्ण केले.

# प्रत्येकाच्या हातून देव, देश, आणि धर्माची सेवा घडत राहो

**विदर्भरत्न हभप संजय पाचपोर महाराज यांचे प्रतिपादन; निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत वृक्षारोपण व चारा वाटप**

नगर – देशाच्या व महाराष्ट्राच्या दृष्टीने आजचा दिवस महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्य दिन, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची जयंती व ज्यांनी गीता सांगितली असे भगवान श्रीकृष्णाची जयंती तसेच वसंत लोढा यांचा जन्मदिवस आहे. भगवान श्रीकृष्णाने गोसेवा करण्यासाठी कृष्णावतार घेतला आहे. बारा वर्षापासून सुरू झालेली निसर्गसृष्टी गोपालन संस्था नावारुपाला आली आहे. मोठ्या प्रमाणात कत्तलखान्यातून वाचलेल्या गाईंचा सांभाळ केला जातो. या गोशाळेचा वाटचालीत काही लोक धनाने, काही लोक मनाने, तर काही लोक तनाने मदत करीत आहेत. आज गोशाळेत वृक्षारोपणही करण्यात आले आहे. प्रत्येकाच्या हातून देव, देश, आणि धर्माची सेवा घडत राहो, अशी गोमातेच्या ज्ञानोबारायांच्या चरणी प्रार्थना करतो, असे प्रतिपादन विदर्भरत्न हभप संजय पाचपोर महाराज यांनी केले आहे.



इसळक येथील निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत स्वातंत्र्य दिन साजरा करून विदर्भरत्न हभप संजय महाराज पाचपोर कृष्णवड या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले.

इसळक येथील निसर्गसृष्टी गोपालन संस्थेत स्वातंत्र्य दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. तसेच विदर्भ रत्न हभप संजय महाराज पाचपोर कृष्णवड या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी भाजपा ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, निसर्गसृष्टी गोपालन संस्थेचे सचिव गौतम कराळे, खजिनदार गजेंद्र सोनवणे, उपाध्यक्ष विश्वास बेरड, पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे, श्रीकांत साठे आदी उपस्थित होते.

वसंत लोढा म्हणाले, भगवान श्रीकृष्णाच्या जयंती निमित्त या गोशाळेची स्थापना करण्यात आली आहे. वर्धापन दिनानिमित्त स्वातंत्र्य दिन व वृक्षारोपण करण्यात येत आहे. निसर्गसृष्टी गोशाळेत मोठ्या प्रमाणात गोरक्षण व संवर्धनाचे कार्य होत आहे. पाचपोर महाराज यांचा आशीर्वाद लाभल्याने चांगल्या पद्धतीने गोशाळेचे काम उभे राहिले आहे. कत्तलखान्यातून वाचविलेल्या गाईंचा सांभाळ या गोशाळेत केला जातो. तसेच इसळक येथील उजाड माळरानावर वृक्षारोपण करून नंदनवन करण्यात आले आहे. वाढदिवसानिमित्त संजय महाराज पाचपोर यांचा आशीर्वाद मिळाल्याने सामाजिक व धार्मिक कार्य करण्याची ऊर्जा मिळाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम कराळे यांनी केले. विश्वास बेरड यांनी आभार मानले.

# नवीन मराठी विश्रामबाग प्रशालेत मुलींनी फोडली दहीहंडी



नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा विश्रामबाग प्रशालेत दहीहंडी उत्साहात पार पडली. इयत्ता पाचवी, सहावी, सातवीच्या मुलींनी ३ थर लावत तिसऱ्या प्रयत्नात दहीहंडी फोडली.

दरवर्षी प्रमाणे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी विश्रामबाग शाळेत दहीहंडी समारंभ उत्साहात पार पडला. यामध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मुले आणि मुली यांच्या संघाने दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला त्यात मुलींच्या संघाने बाजी मारत तिसऱ्या प्रयत्नात दहीहंडी फोडली.

मुलींच्या या संघात कार्तिकी हांडोरे, आर्या गुंड, कोमल लोंढे (कृष्ण), ऋतुजा गायके, अद्वितीया शिंदे, समीक्षा पवार, ज्ञानशी गुंड, आर्या मदने, समृद्धी सांगळे, अन्विता वाळके, तेजस्विनी कर्डिले, आदिती कानडे, स्वराली येनगंदुल, गौरी जज्ञर, समृध्दी उबाळे, पूर्वा गायकवाड, आरोही सुंबे, तनिष्का पवार,समृद्धी सुरसे, अनुष्का पाटील, अदिती पवार, पूर्वा सावंत या विद्यार्थिनींनी सहभाग होता.

सर्वच विद्यार्थ्यांचे संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, मुख्याध्यापिका मीना पवार कौतुक केले आहे. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी शिक्षक संगीता भंडारी, जितेंद्र निकम, रवि चांदेकर, पारूनाथ ढोकळे, लीना पाटोळे, दीपक कराळे, योगिता कासार, कविता जोशी, वैभव मदने, मयूर धाडगे, अश्विनी कोल्हे, योगिता चौरे, जयश्री वाघ, ऋतिक देसाई, शौकत शेख, विशाल देशपांडे आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

शेवटी प्रशालेतील विद्यार्थ्यांना दही काल्याच्या प्रसाद देण्यात आला.

# महानगरपालिकेकडून अत्याधुनिक उपकरणांद्वारे महिलांसाठी मोफत लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया उपलब्ध

**शहरातील नागरिकांनी आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे**

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसूतीगृह येथे लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया उपलब्ध करण्यात आली आहे. त्यासाठी आयडीबीआय बँकेच्या माध्यमातून अत्याधुनिक उपकरणे दाखल झाली आहेत. शहरातील महिलांना अत्याधुनिक, सुरक्षित आणि वेदनारहित उपचारांसाठी ही सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



मनपाकडून अत्याधुनिक उपकरणांद्वारे महिलांसाठी मोफत लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया उपलब्ध करण्यात आली यावेळी आयुक्त यशवंत डांगे आदी. (छाया – लहू दळवी

काही दिवसांपूर्वी महानगरपालिकेने महिला व बाल रुग्णांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेतून मोफत शस्त्रक्रिया उपलब्ध करून दिल्या आहेत. त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहेत. आयडीबीआय बँकेकडून सीएसआर फंडाच्या माध्यमातून बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात दुर्बीण द्वारे शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक एलईडी लाईट सोर्स, सीओटू इन्सुफ्लेटर, टेलिस्कोप, ट्रोकर सेट अशा आधुनिक उपकरणांची उपलब्धता झाली आहे.

यशवंत डांगे यांनी सांगितले की, या माध्यमातून बिनटाका स्त्री नसबंदी, गर्भपिशवी काढणे, अपेंडिक्स व पित्ताशय काढणे, वंध्यत्वासाठी गर्भाशय व नलिकेची तपासणी, तसेच इतर लॅप्रोस्कोपी ऑपरेशन्स केले जाणार आहेत. त्यासाठी आवश्यक डॉक्टर, स्त्रीरोग तज्ज्ञ व सर्जन उपलब्ध आहेत. कमी टाक्यांत आणि अधिक कार्यक्षमतेने सेवा देण्याचा निर्धार या माध्यमातून व्यक्त करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिकेकडून शहरात बुरुडगाव रस्त्यावर नवीन अद्ययावत रुग्णालयाची इमारत उभी राहिली आहे. त्यातील फर्निचर व इतर कामे सुरू आहेत. सावेडी उपनगरातही रुग्णालयासाठी इमारत उपलब्ध झाली आहे. आरोग्यवर्धीनी केंद्र, आपला दवाखाना या माध्यमातून आरोग्य सेवा सुरू केली आहे. बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात अधिकाधिक चांगल्या सेवा देण्यासाठी व अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे, असेही यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

# राधाकृष्ण मंदिरात गोकुळाष्टमीच्या गोड गजरासह देशभक्तीचीही लहर

**जन्माष्टमी व स्वातंत्र्य दिनानिमित्त वेशभूषा स्पर्धा उत्साहात; विद्यार्थ्यांच्या भजन-किर्तन, श्लोकने वातावरण भक्तीमय**

नगर – पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधाकृष्ण मंदिर (ट्रस्ट) सर्जेपुरा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व स्वातंत्र्य दिनानिमित्त वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत चिमुकल्यांनी अक्षरशः बालकृष्ण, यशोदा माता तसेच स्वातंत्र्य संग्रामातील हुतात्म्यांचे जिवंत रूप साकारून उपस्थितांचे मन जिंकले. या कार्यक्रमातून गोकुळाष्टमीच्या गोड गजरासह देशभक्तीचीही लहर अनुभवायला मिळाली.



पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधाकृष्ण मंदिर (ट्रस्ट) सर्जेपुरा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी व स्वातंत्र्य दिनानिमित्त वेशभूषा स्पर्धेमध्ये सहभागी झालेले चिमुकले.

श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विविध कार्यक्रमांनी मंदिर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पालक आपल्या मुलांना सुंदर वेशभूषा घालून घेऊन आले होते. छोट्या-छोट्या पावलांनी मंचावर आलेले नटखट कृष्ण व त्यांच्या यशोदा माता या जोडीने कार्यक्रमाची शोभा वाढवली. तर स्वातंत्र्य लढ्यातील शहीद भगतसिंग, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस आदी व्यक्तिमत्वांच्या वेशभूषेत आलेल्या बालगोपाळांनी देशभक्तीची प्रेरणादायी झलक सादर केली. यावेळी १२ ते १५ वर्ष वयोगटातील मुला-मुलींसाठी भजन-किर्तन, श्लोक स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत देखील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून उत्तमप्रकारे सादर केलेल्या भजन-किर्तन, श्लोकने वातावरण भक्तीमय बनले होते.

कार्यक्रमात केवळ मुलांनीच नव्हे तर त्यांच्या मातांनीही उत्साहाने सहभाग घेतला. कृष्ण-यशोदा जोड्यांनी विविध भक्तिगीतांवर सादरीकरण करत त्या युगातील प्रेम, ममता व भक्तीचे भाव उपस्थितांना अनुभवायला लावले. या वेशभूषा स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जागृती ओबेराय, रुपा पंजाबी, निशा धुप्पड, स्वीटी गुप्ता, मिनू चड्ढा यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे परीक्षण सुरेखा मन्यार यांनी केले.

श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त राधाकृष्ण मंदिरात ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता व सर्व विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु झाली आहे. मंदिरास आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आली. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी बालकृष्णाच्या दर्शनाचा आनंद घेतला.

